




वर्ष ५७ वे । अंक ३५३ वा । पाने ६ । किंमत २ रूपये

दैनिक **सत्यप्रभा** बातम्यांसोबत विचार देणारे

शनिवार, दि. १२ जुलै २०२५

PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026

epaper.satyaprabha.com

dainiksatyaprabha2015@gmail.com


*लॉर्ड्स : लॉर्ड्स कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी इंग्लंडचा पहिला डाव ३८७ धावांवर आटोपला. इंग्लंडकडून जो रूट, जेमी स्मिथ आणि ब्रायडन कार्स यांनी पहिल्या डावात तुफानी फलंदाजी केली. याशिवाय कर्णधार बेन स्टोक्स आणि ऑली पोप यांनी प्रत्येकी ४४ धावांचे योगदान दिले. दुसरीकडे, जसप्रीत बुमराहने टीम इंडियाकडून ५ बळी घेतले. तर नितीश कुमार रेड्डी आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. रवींद्र जाडेजाने एक विकेट घेतली. इंग्लंडचा अनुभवी फलंदाज आणि माजी कर्णधार जो रुटने अविस्मरणीय शतक ठोकले. जो रुटच्या कसोटी कारकीर्दीतील हे ३७ वे तर टीम इंडिया विरुद्ध ११ वे शतक ठरले.*

## संक्षिप्त

### आ. गायकवाडांविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल

**मुंबई :** मंत्रालयाजवळील आमदार निवासामधील उपहारगृहातील कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी आ. संजय गायकवाड यांच्याविरोधात मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्हायरल चित्रफीतीच्या आधारे पोलिसांनी स्वतः याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. आ. गायकवाड यांनी केलेल्या मारहाणीची मुद्दा सभागृहातही गाजला होता. त्यानंतर आ. गायकवाड यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

### गुंतवणूकदारांचे तब्बल ३.७७ लाख कोटी स्वाहा

**मुंबई :** शेअर बाजारात आज जबरदस्त घसरण झाली. सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही लाल निशाण्यावर बंद झाले. आयटी कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. त्यामुळे बाजारात निराशा पसरली आहे. सेन्सेक्स ६९० अंकांनी खाली आला आणि ८२,५०० वर बंद झाला. निफ्टी २०५ अंकांनी घसरुन २५,१४९ वर बंद झाला. लिस्टेड असलेल्या कंपन्यांचे एकूण मार्केट कॅप ३.७७ लाख कोटी रुपयांनी कमी झाले. ते ४५६.४८ लाख कोटी रुपये इतके झाले. याचा अर्थ, गुंतवणूकदारांना एका दिवसात ३.७७ लाख कोटींचे नुकसान झाले.

### जनसुरक्षा विधेयकाला न्यायालयात आव्हान

**मुंबई :** सरकारने सादर केलेल्या महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयकाविरोधात वंचित बहुजन आघाडी न्यायालयात जाणार आहे. आघाडीचे प्रमुख अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर म्हणाले, की हे विधेयक महाराष्ट्राच्या सामाजिक न्यायाच्या ऐतिहासिक वाटचालीवर आघात करणारे असून, या विरोधात आम्ही न्यायालयात लढा देणार आहोत. हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर, लोकशाही मूल्यांवर आणि संविधानावर थेट आघात करणारे आहे. आम्ही या विधेयकाचा संविधानिक मार्गाने विरोध करत राहू.

### बीडीडीवासियांना मुख्यमंत्री देणार चाव्या

**मुंबई :** मुंबईतील बीडीडी चाळीतील रहिवाशांना हक्काची घरे मिळणार आहेत. विधिमंडळ अधिवेशन संपल्यानंतर २१ जुलै रोजी घरांच्या हस्तांतरणाचा कार्यक्रम होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते घराच्या चाव्या चाळीतील रहिवाशांना देण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ५०० चौरस फुटाच्या ५५६ फ्लॅट्सचे वाटप करण्यात येणार असल्याचे म्हाडा मुंबई बोर्डाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी सांगितले. वर्षाअखेरीस आम्हाला तीन ठिकाणी ३ हजार ९८९ फ्लॅट्स मिळणार आहेत, अशी माहितीही बोरीकर यांनी दिली. बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्पाची नोडल एजन्सी म्हणून म्हाडा काम पाहात आहे.

### रेल्वेची चाके नखळली, पनवेल-नांदेडला उशीर

**रायगड :** मुंबई - पुणे रेल्वे मार्गांवर खंडाळ्याजवळ आज मंकीहिल येथे मालगाडीच्या बोगीची चाके निखळून पडल्याने वाहतूक ठप्प झाली होती. खंडाळा घाटात मंकीहिलजवळ पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वेच्या सुरक्षा रक्षक बोगीची चाके निखळून पडल्याने पुण्याकडे जाणारी वाहतूक घाटात काही काळ ठप्प झाली होती. यामुळे पनवेल-नांदेड या रेल्वेला उशीर झाला. काही रेल्वे पनवेल स्टेशनला रात्री उशिरापर्यंत थांबविण्यात आल्या होत्या.

### असा निर्णय घेणारे महाराष्ट्र पहिले राज्य | पशुपालन व्यवसायासाठी ठरणार क्रांतीकारी निर्णय

# पशुपालन व्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा!

### पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे विधानसभेत निवेदन

**मुंबई, दि. ११ :** पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात पशुपालन व्यवसायास 'कृषी व्यवसायाचा' दर्जा देण्यात आला आहे. राज्यातील पशुपालन व्यवसायाला मोठा दिलासा देणारा हा निर्णय असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले, की पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी हा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ७६.४१ लक्ष पशुपालक कुटुंबांना होईल. या निर्णयामुळे पशुजन्य *(पान दोनवर)*

### ग्रामीण उद्योजक तयार होणार



### ७६ लाख कुटुंबांना फायदा

या निर्णयामुळे शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७६ लाख कुटुंब पशुसंवर्धनाच्या व्यवसायात आहेत, त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रातील पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती घडेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

### नांदेड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या

# डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाचे उद्या लोकार्पण

### खा. अशोकराव चव्हाण यांनी केली नूतनीकरणानंतर प्रेक्षागृहाची पाहणी





**नांदेड, दि. ११ :** महापालिकेच्या वतीने नूतनीकरणाचे काम वेगाने पूर्ण करून अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज केलेल्या डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाचा लोकार्पण सोहळा माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते रविवारी (दि.१३) दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर खा.अशोकराव चव्हाण यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन प्रेक्षागृहाच्या कामाची पाहणी केली.

नांदेड हे सांस्कृतिक, साहित्यिक व वैचारिक वारसा असणारे शहर असून नांदेडकर रसिक श्रोत्यांसाठी श्री गुरु गोविंदसिंगजी स्टेडियम परिसरात काही वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या प्रशस्त अशा डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाच्या नूतनीकरणाचे काम महापालिकेच्या वतीने नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे रसिकांना अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज असलेले प्रेक्षागृह उपलब्ध असणार आहे. या प्रेक्षागृहाच्या कामाची पाहणी आज खा. अशोकराव चव्हाण यांनी केली. कामाचा दर्जा व इतर बाबींची पडताळणी करुन प्रेक्षागृहाचे काम अतिशय दर्जेदार झाले असून प्रेक्षागृहात डिजिटल स्क्रीन लावून प्रक्षेपणाची व्यवस्था करण्याची सूचना देखील त्यांनी यावेळी केली. या प्रेक्षागृहामुळे नांदेडच्या सांस्कृतिक वैभवात भर पडणार असल्याचे मत खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केले. यावेळी भाजपाचे नांदेड महानगराध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर यांचीही उपस्थिती होती. सुसज्ज डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाचा लोकार्पण सोहळा खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते रविवारी दुपारी १२ वाजता *(पान दोनवर)*

### आसनक्षमता वाढली

प्रेक्षागृहाचे नूतनीकरण करताना पूर्वीपेक्षा आसन व्यवस्था वाढवण्यात आली असून आता एकाचवेळी ८२० श्रोते बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाची साऊंड सिस्टीम देखील उपलब्ध करुन देण्यात आली असून संपूर्ण सभागृह वातानकुलित (एसी)असणार आहे. प्रेक्षागृहावर सौरऊर्जा युनिट बसविण्यात आले असून त्यामुळे यापुढील विद्युत खर्चात बचत होणार आहे.

### राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर होणार कायद्यात रुपांतर

# जनसुरक्षा विधेयक विधानपरिषदेत मंजूर

**मुंबई, दि. ११ :** देशाच्या संविधानाला आव्हान देणाऱ्या, माओवादी प्रवृत्तीच्या संघटनांवर प्रतिबंध घालण्यासाठी विधानपरिषदेत आज 'महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४' मांडण्यात आले. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी हे विधेयक सभागृहात मांडत त्यामागील कारणे आणि गरज स्पष्ट केली. विधेयकावर सखोल चर्चा झाल्यानंतर सभापती प्रा. राम शिंदे यांनी ते बहुमताने मंजूर झाल्याचे जाहीर केले.

गृहराज्यमंत्री कदम यांनी सांगितले, की हे विधेयक लोकशाहीला आव्हान देणाऱ्या आणि शहरी नक्षलवादाला प्रोत्साहन देणाऱ्या संघटनांवर कारवाई करण्यासाठी आहे. राज्यात सध्या अशा प्रकारच्या एकूण ६४ संघटना सक्रिय असून, त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यूएपीए कायद्याच्या मर्यादा अधोरेखित करत ते म्हणाले, की यूएपीए फक्त *(पान दोनवर)*

# 'डिजिटल इंडिया'च्या नावे फसवणूक

### हजारो नागरिकांना गंडा घालणाऱ्या ठकाला अखेर बेड्या

**नांदेड दि. ११ :** डिजिटल इंडिया, महाराष्ट्र आणि केंद्रशासन मान्यताप्राप्त असा बोर्ड लावून राज्य शासनाच्या विविध विभागांच्या नावे वेगवेगळ्या योजनांचा लाभ देण्याचे आमिष दाखवून नांदेड जिल्ह्यातील हजारो नागरिकांकडून लाखो रुपये उकळणाऱ्या ठकाविरुद्ध अखेर वजीराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला पोलिसांनी गुरुवारी न्यायालयापुढे हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्वतः लक्ष घालून सामान्य नागरिकांची फसवणूक होऊ नये म्हणून तातडीने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवांश कम्युनिकेशन या कार्यालयामार्फत वीरेंद्रसिंह हजारी याने २०२४ पासून एका वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विविध शासकीय योजनांचा लाभ मिळेल असे नमूद केले होते. महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार मिळावा आणि ते कोणावरही अवलंबून राहू नये म्हणून जाहिरात, बॅनरबाजी केली. बेरोजगारांना *(पान दोनवर)*

### निवडणूक आयुक्तांचे महापालिका आयुक्तांना निर्देश

# निवडणुका आल्या..ईव्हीएम सज्ज ठेवा!

**मुंबई, दि. ११ :** राज्यातील महापालिकांच्या आगामी निवडणुकांसाठी आवश्यक ती सर्व प्रकारची पूर्वतयारी करून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) प्राथमिक तपासणी करावी. आणि ती मतदानासाठी सज्ज करावीत, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज येथे दिले.

महापालिकांच्या आगामी निवडणुकांच्या प्राथमिक तयारीसंदर्भात विभागीय आयुक्त आणि महापालिका आयुक्तांची आज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्यासह आयोगाचे विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्यातील सर्व २९ महापालिकांच्या निवडणुकांच्या तयारीबाबत आतापासूनच दक्ष राहण्याची *(पान दोनवर)*

### प्रशासकीय कार्यवाहीला वेग

राज्यातील महापालिकांच्या निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळा संपल्यानंतर लगेच त्याची घोषणा होऊ शकते. या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्वाची होती. त्यामुळे एकूण तयारीबाबत सर्व तपशीलवार व अद्ययावत माहिती तयार ठेवावी. त्याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. त्यावेळी ही माहिती सादर करावी, असे आदेश आजच्या बैठकीत देण्यात आले.


## नांदेड चेम्बर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज नांदेड

(नोंदणी क्र F-220 नांदेड)

### सर्वसाधारण सभेची सुचना

नांदेड चेम्बर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीस, नांदेड संस्थेचे अध्यक्ष **श्री दत्तात्रय पांडुरंगराव सावंत** यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा **दि 12/07/2025 रोजी स. 11 वा.** आयोजित केली आहे. या सभेत **निवडणुकीबाबत महत्वपूर्ण चर्चा** करण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थीत राहावे, हि विनंती...

**स्थळ - हॉटेल चंद्रलोक,** महाराणा प्रताप चौकाजवळ, नांदेड

**सभेचे विषय**

1) मा. धर्मदाय उपआयुक्त, नांदेड यांच्या चौ.क. 139/25 मधील आदेशाप्रमाणे संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक घेणे.
2) संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवड सभेत बहुमताने घेण्यात येईल. आवश्यकता पडल्यास निवडणूक अधिकाऱ्याच्या मार्फत मंडळावर सभासद पदाधिकारी याची निवड करण्यात येईल. त्यासाठी निवडणुकीचा कार्यक्रम सोबत जोडला आहे.

**नोट -** कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी एक तासांनी सभा घेण्यात येईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.





## संक्षिप्त

### पिंपरी–चिंचवडचे नाव राजमाता जिजाऊनगर करा

**मुंबई :** औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव, तर अहमदनगरचे अहिल्यानगर असे नामकरण झाल्यानंतर आता भाजपा आ. उमा खापरे यांनी शुक्रवारी (११ जुलै) पिंपरी–चिंचवडचे नाव राजमाता जिजाऊनगर करण्याची मागणी विधानपरिषदेत केली. यावेळी आ. खापरे यांनी काही ऐतिहासिक दाखलेही सभागृहात दिले. पिंपरी–चिंचवड शहराला पीसीएमसी असे इंग्रजीमध्ये म्हटले जाते. पण, पिंपरी– चिंचवड आणि भोसरी अशी तीन गावे मिळून शहर आहे. भोसरी हे भोज राजाचे संस्थान असल्याचा दाखलाही इतिहासात उपलब्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि जगद्गुरु तुकाराम महाराजांची भेट चिंचवडमधील मंगलमूर्ती वाड्यामध्ये झाली होती. हा चिंचवडचा इतिहास आहे. अशा ऐतिहासिक नगरीचे नाव राजमाता जिजाऊनगर करवे, अशी मागणी आ. उमा खापरे यांनी केली.

### टी. राजा सिंह यांचा राजीनामा भाजपा नेतृत्वाने स्वीकारला

**हैदराबाद :** आपल्या आक्रमक आणि वादग्रस्त वक्तव्यांसाठी प्रसिद्ध असलेले तेलंगाणामधील गोशामहल मतदारसंघाचे भाजपाचे आ. टी. राजा सिंह यांनी काही दिवसांपूर्वी पक्षाचा राजीनामा दिला होता. आज भाजपाने राजा सिंह यांचा राजीनामा स्वीकारला आहे. आ. राजा सिंह यांनी एन. रामचंदर राव यांना भाजपाचे तेलंगाणामधील प्रदेशाध्यक्ष बनवल्याच्या निषेधार्थ पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. भाजपाने त्यांचा राजीनामा स्वीकारून त्यांना जबर राजकीय धक्का दिला आहे.२०१४, २०१८ आणि २०२३ च्या निवडणुकीत त्यांनी या मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने विजय मिळवलेला आहे. गोशामहल मतदारसंघ ओवेसींच्या एमआयएमचे वर्चस्व असलेल्या हैदराबाद लोकसभा मतदारसंघात येतो. मात्र, या भागात राजा सिंह यांनी आपले वर्चस्व राखलेले आहे.

### शरद पवार गटासह प्रहारच्या कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**लातूर :** लातूर जिल्ह्यातील चाकूरचे माजी नगराध्यक्ष व प्रहारचे नेते कपील माकणे, बाजार समितीचे सभापती शरद पवार गटाचे निळकंठ मिरकले यांच्यासह शरद पवार गट, प्रहारच्या असंख्य कार्यकर्त्यांनी शुक्रवारी भाजपात प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमामध्ये प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी शरद पवार गटाचे डॉ. गोविंद माकणे, चाकूर बाजार समितीचे उपसभापती लक्ष्मण दंडिमे यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला. बाबुराव सूर्यवंशी, दत्ता कलाले, मुरंबीचे सरपंच, उपसरपंच सुनिल चिंताले व ज्ञानोबा चावले, दयानंद सूर्यवंशी, अमोल शेटे, हिरकणबाई लाटे, बाळू लाटे आदींनी भाजपात प्रवेश केला.

### हिंदुस्थान लिव्हरचा कारभार प्रथमच महिलेच्या हाती

**मुंबई :** भारतातील सर्वात मोठ्या कंपन्यांपैकी एक हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेडने पहिल्यांदाच कंपनीच्या एमडी आणि सीईओपदी महिलेची वर्णी लागली आहे. प्रिया नायर यांनी हा इतिहास घडवला आहे. प्रिया नायर यांनी १९९५ मध्ये मॅनेजमेंट ट्रेनी म्हणून करिअरची सुरुवात केली होती. तेव्हापासून आतापर्यंत त्यांनी कंपनीत होम केअर, ब्युटी अँड पर्सनल केअर आणि वेलबीईंग पोर्टफोलियोत अनेक पदावर काम केले आहे. सध्या त्या युनिलिव्हरच्या ग्लोबल टीममध्ये आहेत. त्या ब्युटी अँड वेलबीईंग बिझनेस ग्रुपच्या अध्यक्षा आहेत.

### बलुचिस्तानमध्ये ओळखपत्र तपासून नऊ प्रवाशांची हत्या

**लाहोर :** पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रातांत पंजाब प्रांतातील नऊ प्रवाशांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. गुरूवारी एका बसमधून या प्रवाशांचे अपहरण करण्यात आले होते. सशस्त्र बंडखोरांनी क्वेटाहून लाहोरला जाणाऱ्या बसमधील प्रवाशांचे ओळखपत्र तपासले. त्यानंतर बसमधून नऊ प्रवाशांचे अपहरण करत त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. बलुचमधील बंडखोरांनी अशा प्रकारचे हल्ले यापूर्वीही केलेले आहेत. मृत नऊ व्यक्ती पंजाब प्रांतातील विविध भागातून आले होते.

### ४९ हजार कोटींची फसवणूक, आरोपी गुरनाम सिंगला अटक

**चंदीगड :** भारतातील सर्वात मोठ्या आर्थिक फसवणुकींपैकी एक असेलल्या पर्ल्स अ‍ॅग्रो–टेक कॉर्पोरेशन लिमिटेड या पॉन्झी स्किम प्रकरणात कंपनीचा संचालक गुरनाम सिंग (वय ६९) याला अटक करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशच्या आर्थिक गुन्हे शाखेने पंजाबच्या रोपर जिल्ह्यात गुरनाम सिंगला अटक केली. पॉन्झी स्किमच्या माध्यमातून उत्तर प्रदेश, आसाम, पंजाब, राजस्थान, दिल्ली, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, केरळ, बिहार आणि छत्तीसगड अशा १० राज्यांमधील पाच कोटी गुंतवणूकदारांकडून तब्बल ४९ हजार कोटी रुपयांची रक्कम बेकायदेशीरपणे गोळा करत घोटाळा केल्याबद्दल त्याला अटक करण्यात आली. या प्रकरणातील दहा आरोपींपैकी गुरनाम सिंग एक आहे.

### पाण्यासाठी तडफडणार पाकिस्तान; ३११९ कोटी कर्जासाठी हालचाली गतीमान

# चिनाब नदीवर भारत उभारणार जलविद्युत प्रकल्प, कामाला सुरुवात



**नवी दिल्ली, दि. ११ :** केंद्र सरकारने जम्मू–काश्मीरमधील चिनाब नदीवर उभारण्यात येणाऱ्या क्वार जलविद्युत प्रकल्पासाठी ३११९ कोटी रुपयांच्या कर्जासाठी आर्थिक संस्थांकडे प्रस्ताव पाठवले आहेत. या प्रकल्पामुळे पाकिस्तानला जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहावर परिणाम होऊ शकतो.

पाकिस्तान सिंधू नदीच्या पाणी वाटपाच्या करारावर भारताने घेतलेल्या भूमिकेमुळे खूपच अस्वस्थ आहे. त्यातच आता भारताने एक नवीन योजना बनवली आहे. त्यामुळे पाकिस्तानची झोप उडणार आहे. भारत सरकार जम्मू–काश्मीरमधील किश्तवाड येथे चिनाब नदीवर 'क्वार' नावाचा जलविद्युत प्रकल्प वेगाने सुरू करणार आहे. यासाठी ३११९ कोटी रुपये कर्ज घेतले जाणार आहे. एकूण योजनेसाठी ४५२६ कोटी निधी लागणार आहे. मीडिया रिपोर्टसनुसार, भारताने सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित केल्यानंतर हे पाऊल उचलले आहे. यामुळे पाकिस्तानात असलेल्या नदीपात्राच्या भागांमध्ये पाण्याची चिंता वाढली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध अधिक बिघडले आहेत. मे महिन्यात दोन्ही देशांमध्ये सैन्य संघर्ष झाला होता. अशा स्थितीत क्वार जलविद्युत प्रकल्प वेगाने सुरू करण्याचा भारताचा निर्णय महत्त्वाचा आहे. हा प्रकल्प 'चिनाब व्हॅली पॉवर प्रोजेक्ट्स लिमिटेड'च्या माध्यमातून पूर्ण केला जाणार आहे. ही कंपनी एनएचपीसी लिमिटेड आणि जम्मू–काश्मीर राज्य विद्युत विकास महामंडळ यांचा संयुक्त उपक्रम आहे. हा प्रकल्प किश्तवार जिल्ह्यात (चिनाब नदीवर उभारला जाईल. धरणाची उंची १०९ मीटर असून वीज निर्मिती क्षमता ५४० मेगावॅट आहे. २०२७ हा प्रकल्प पूर्ण करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाचा एक मोठा टप्पा, चिनाब नदीचे वळवणे (डायव्हर्जन), जानेवारी २०२४ मध्ये पूर्ण झाला. यानंतर मुख्य धरणाच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे. यासोबतच ६०९ मीटर लांबीच्या मुख्य प्रवेश बोगद्याच्या खोदकामालाही सुरुवात झाली आहे.

सिंधू जलवापट करारानुसार, भारताला सतलज, रावी आणि बियास नद्यांचा वापर करण्याचा हक्क आहे, तर चिनाब, झेलम आणि सिंधू नद्यांचा प्रमुख हक्क पाकिस्तानकडे आहे. मात्र, भारताने अलीकडे या संधीच्या अंमलबजावणीबाबत आक्रमक भूमिका घेऊन पाकिस्तानवर पाण्याद्वारे दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. चिनाब नदीवरील हे धरण पूर्ण झाल्यावर जम्मू–काश्मीरमधील ऊर्जा गरजा पूर्ण होतील आणि भारताच्या जलनीतीला नवीन दिशा मिळेल.

## मराठी फिल्मफेअरमध्ये 'पाणी', 'फुलवंती'ची बाजी!



### महेश मांजरेकर सर्वोत्कृष्ट अभिनेता, प्राजक्ता माळी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री

**मुंबई, दि. ११ :** मराठी चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठेचा फिल्मफेअर पुरस्कार मराठी २०२५ गुरुवारी (दि. १०) सायंकाळी पार पडला. या पुरस्काराचे हे यंदाचे दहावे वर्षे होते. यावर्षी सर्वोत्कृष्ट चित्रपट या पुरस्कारावर आदिनाथ कोठारे आणि ऋचा वैद्य यांच्या पाणी सिनेमाने नाव कोरले. तर जुनं फर्निचर या सिनेमासाठी अभिनेते महेश मांजरेकर यांनी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार पटकावला.

सर्वोत्कृष्टी अभिनेत्री हा पुरस्कार प्राजक्ता माळी (फुलवंती) आणि वैदेही परशुरामी (एक दोन तीन चार) यांना विभागून देण्यात आला. प्राजक्ताच्या फुलवंतीने सर्वाधिक सात तर पाणी या सिनेमाने सहा पुरस्कार जिंकले आहेत. ख्यातनाम पार्श्वगायिका उषा मंगेशकर यांना फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार विजेत्यांमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट– पाणी, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक– आदिनाथ कोठारे (पाणी), सर्वोत्कृष्ट चित्रपट (परीक्षक पसंती)– गाठ, अमलताश, सर्वोत्कृष्ट अभिनेता– महेश मांजरेकर (जुनं फर्निचर), सर्वोत्कृष्ट अभिनेता (परीक्षक पसंती)– जितेंद्र जोशी (गाठ), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री– प्राजक्ता माळी (फुलवंती) आणि वैदेही परशुरामी (एक दोन तीन चार), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (परीक्षक पसंती)– राजश्री देशपांडे (सत्यशोधक), सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेता– क्षीतिज दाते (धर्मवीर २), सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्री– नम्रता संभेराव (नाच गं घुमा), सर्वोत्कृष्ट नवोदित अभिनेत्री– जुई भागवत (लाईक अँड सबस्क्राइब)

सर्वोत्कृष्ट नवोदित अभिनेता– धैर्य घोलप (येक नंबर), सर्वोत्कृष्ट गायिका– वैशाली माडे, फुलवंती (मदनमंजिरी), सर्वोत्कृष्ट गायक– राहुल देशपांडे (अमलताश), सर्वोत्कृष्ट गीतकार– दिवंगत शांता शेळके (अमलताश), सर्वोत्कृष्ट संगीत– अनमोल भावे (पाणी) यांना हे पुरस्कार देण्यात आले.

### आयएसडब्ल्यूएआयचा उत्पादन शुल्कवाढीला आक्षेप

## राज्यात मद्य महागणार!

**पुणे, दि. ११ :** महाराष्ट्र शासनाने भारतीय बनावटीच्या परदेशी मद्यावर (आयएमएफएल) उत्पादन शुल्कात मोठी वाढ केल्याच्या निर्णयावर इंटरनॅशनल स्पिरिट्स अँड वाईन असोसिएशन ऑफ इंडियाने (आयएसडब्ल्यूएआय) तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रीमियम भारतीय मद्य उद्योगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संस्थेने या निर्णयामुळे राज्यातील मद्य उद्योगासमोर गंभीर आव्हान निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

उद्योग क्षेत्रातील अंदाजानुसार, आयएमएफएलच्या किमतींत ६५ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. त्यामुळे १८० मिली बाटलीसाठी १०० ते १३० रुपये अधिक मोजावे लागतील. उद्योगतज्ज्ञांनी या वाढीमुळे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या विपरित परिणाम होण्याचा इशारा दिला आहे. आयएसडब्ल्यूएआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजित पाधी म्हणाले, ही दरवाढ ग्राहकांना स्वस्त, अनियंत्रित आणि कदाचित असुरक्षित मद्याच्या पर्यायांकडे वळण्यास प्रवृत्त करू शकते. शेजारील राज्यांशी तुलना करता ही वाढ मनमानी वाटते. त्यामुळे बेकायदेशीर मद्यनिर्मिती आणि तस्करीला प्रोत्साहन मिळून सार्वजनिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

याशिवाय आयएमएफएल विक्रीत घट झाल्यास, धान्य–आधारित मद्याची मागणी कमी होऊन ग्रामीण शेतकऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रीमियम ब्रँड्स महाग झाल्यामुळे ग्राहक कमी गुणवत्तेच्या मद्याकडे वळण्याची शक्यता आहे. तसेच दरवाढीनंतरही अपेक्षित महसूल वाढ न होण्याचा धोका आहे.

तसेच गोवा, मध्य प्रदेशसारख्या सीमावर्ती राज्यांतून अवैध मद्याचा वापर वाढण्याचा धोका आहे. या पार्श्वभूमीवर आयएसडब्ल्यूएआयने शासनाला इतर राज्यांच्या धोरणांचा अभ्यास करून अधिक संतुलित दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवारांचे केंद्र सरकारला पत्र

## चीनमधून होणारी बेकायदा आयात थांबवा

**मुंबई, दि. ११ :** चीनमधून कर चुकवून निकृष्ट बेदाण्यांची मोठ्या प्रमाणावर आयात होत असून यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आणि राष्ट्रीय महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. चीनमधून होणारी बेदाण्यांची बेकायदा आयात थांबवावी. बेदाण्यांचे दर स्थिर ठेवून द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी पत्र लिहून केंद्र सरकारकडे केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भात केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान तसेच केंद्रीय व्यापारमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहिले असून महाराष्ट्रातील आणि देशातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले आहे. चीनमधून निकृष्ट दर्जाच्या बेदाण्यांची बेकायदा आयात वाढली आहे. आयात कर आणि शुल्क चुकवून बेदाणे मोठ्या प्रमाणावर भारतात आणले जात आहेत. या करचोरीमुळे शासनाचा महसूल बुडत असून देशाच्या महसुलाचे नुकसान होत आहे. ऐन हंगामात होत असलेल्या बेकायदा आयातीमुळे देशातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या बेदाण्यांचे दर प्रतिकिलो शंभर ते सव्वाशे रुपयांनी घसरले आहेत. याचा फटका द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. बेकायदा आयात व विक्री थांबवण्यासाठी कठोर कारवाई करावी. आयात होणाऱ्या बेदाण्यांचा दर्जा तपासण्यासाठी तसेच करवसुली योग्य, अचूक होण्यासाठी बंदरे, विमानतळ, बाजारपेठांच्या ठिकाणी तपास व करवसुली यंत्रणा कार्यक्षम करावी. ऐन हंगामात बाजारातील बेदाण्यांचे दर स्थिर राखून शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रात केली आहे.

## विनापरवाना भोंग्यासाठी संबंधित पोलीस जबाबदार

### मुंबई भोंगेमुक्त झाल्याबद्दल मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

**मुंबई, दि. ११ :** राज्यातील विशेषतः मुंबईतील विनापरवाना भोंगे आता बंद झाले आहेत. मात्र, भोंगा वाजत असलेल्या भागातील पोलीस अधिकाऱ्यांना यापुढे जबाबदार धरले जाईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिला. विशेष म्हणजे यावेळी त्यांनी मुंबई पोलिसांचेही कौतुक केले. कोणताही धार्मिक तणाव न होऊ देता मुंबई पोलिसांनी कारवाई केले त्यामुळे त्यांचे अभिनंदन, असे ते म्हणाले.

भाजपाचे सुधीर मुनगंटीवार यांनी लक्षवेधी मांडताना लाऊडस्पीकर आणि मशिदींवरील भोंग्यांबाबत मुद्दा उपस्थित केला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की आतापर्यंत ३३६७ धार्मिक स्थळांवरील भोंगे आम्ही हटवले आहेत. त्यामध्ये मुंबईचा विचार केला तर शहरातील १६०८ भोंगे हटवले आहेत. त्यामध्ये ११४९ मशिदी, ४८ मंदिरे, १० चर्च, ४ गुरुद्वारा आणि इतर १४७ इतर असे काही भोंगे आहेत. सध्या मुंबईतील एकाही धार्मिक स्थळावर भोंगा नाही. राज्यात १७५९ धार्मिक स्थळांवरील भोंगे आपण हटवले आहेत. यासंदर्भात एक अहवाल उच्च न्यायालयाकडे दाखल केला आहे. यावर न्यायालयाने समाधान व्यक्त केले आहे. मुंबई पोलिसांचे मी विशेष कौतुक करेन कारण त्यांनी १६०८ भोंगे हटवले. ते हटवत असताना त्यांनी चर्चा करून, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश दाखवून समजसपणे कुठेही धार्मिक तणाव न करता, यावेळी कुठेही गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता पडली नाही. मुंबईला भोंगेमुक्त करण्याचे काम हे आपल्या मुंबई पोलिसांनी केले आहे, असे म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंबई पोलिसांचे कौतुक केले आहे.

दरम्यान, भोंग्याच्या मुद्द्यावरुन आ. आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. आता गणपती, नवरात्री, दहीहंडी आहे. या काळात मिरवणुका काढण्यात येतात. अनेकदा स्थानिक पोलीस ठाण्याकडून तेथील मंडळांना परवानग्या असून देखील त्रास दिला जातो. मंडळांकडे सर्व परवानगी असतील आणि जे पोलीस या मंडळांना त्रास देतील, त्यांच्यावर कारवाई होणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावर मुख्यमंत्री म्हणाले, की कायद्याने तत्काळ परवानग्या घेऊन मंडळांना भोंगे लावण्याची परवानगी देता येते. यावेळी डेसिबलची मर्यादा देण्यात येते. निश्चितपणे यावेळी कोणालाही त्रास होणार नाही. यावेळी शिवसेना उबाठा गटाचे भास्कर जाधव यांनीदेखील मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्णयाचे कौतुक केले.

## एमपीएससी परीक्षेचा निकाल जाहीर

### ६५१९ उमेदवारांची निवड, सोलापूरचे तन्मय राज्यात पहिले

**मुंबई,दि. ११ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे लिपिक–टंकलेखक मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. १७ डिसेंबर २०२३ रोजी परीक्षा झाली होती. परीक्षेतून ६५१९ उमेदवारांची निवड झाली आहे. गुणवत्ता यादी आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सोलापूरचे कटुळे तन्मय तानाजी राज्यात प्रथम आले आहेत. पुणे जिल्ह्यातील किसवे किशोर चंद्रकांत मागासवर्गीयांमध्ये पहिले आहेत. सांगलीच्या दुर्गा विजयराव गावडे महिलांमध्ये प्रथम आहेत. मुंबईसह छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, नाशिक आणि पुणे या जिल्हा केंद्रांवर घेण्यात आलेल्या या परीक्षेतून एकूण ६५१९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. या परीक्षेच्या माध्यमातून एकूण २७८ नियुक्ती प्राधिकारी कार्यालयांमधील पदांसाठी ही शिफारस करण्यात आली आहे. आयोगाने या परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी आणि नियुक्ती प्राधिकरणनिहाय स्वतंत्र शिफारस याद्या आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या आहेत.

### हिटमॅनच्या वर्ल्डकप २०२७ स्वप्नांवर पाणी?

## वनडे संघाच्या कर्णधारपदी शुबमन गिलची लागणार वर्णी?



**मुंबई, दि. ११ :** कसोटी संघाचा नवा कर्णधार शुबमन गिलकडेच एकदिवसीय संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी दिली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. काही मीडिया रिपोर्टनुसार कसोटीनंतर आता वनडे संघाच्या कर्णधारपदीही शुबमन गिल याची निवड होण्याची शक्यता आहे. मात्र, बीसीसीआयने अधिकृत माहिती दिलेली नाही. येत्या ऑगस्टमध्ये भारत आणि श्रीलंकेमध्ये मालिका होणार आहे. या मालिकेवेळीच शुबमनच्या नावाची घोषणा होणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे रोहित शर्मासाठी मोठा धक्का मानला जात आहे. रोहित शर्माने कसोटी आणि टी–२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यावर वनडे क्रिकेटमध्ये खेळणार असल्याचे बोलले जाते. मात्र, याच दरम्यान शुबमनला वनडचेही कर्णधारपद मिळणार असल्याच्या दाव्यांची जोरदार चर्चा होताना दिसत आहे. इंग्लंडविरूद्धची कसोटी मालिका झाल्यावर श्रीलंका दौरा आहे. श्रीलंका दौऱ्यावर शुबमनला कर्णधार करुन भारतीय नियमाक मंडळ ही तयारी सुरु करु शकते. इंग्लंड दौऱ्यावर भारताचे कर्णधारपद शुबमन गिल जबाबदारीने पाडत आहे. पहिली कसोटी गमावल्यावर भारताने दुसऱ्या कसोटीमध्ये कमबॅक केले होते. ज्या मैदानावर भारताने कधी विजय मिळवला नाही त्या मैदानावर पहिला विजय साकारला. एकाच कसोटीत द्विशतक आणि शतकही झळकावले आहे. त्याच्या या कामगिरीमुळे भविष्यात भारताच्या कसोटी, वनडे आणि टी–२० ची धूरा त्याच्याकडे दिली जाऊ शकते.

## पान एकवरून

**पशुपालन व्यवसायाला...**

उत्पादनातून सुमारे ७,७०० कोटी रुपये इतकी वाढ अभिप्रेत आहे. या निर्णयानुसार राज्यातील वीज दर आकारणी, कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्यासाठी कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते त्याच दराने कर आकारणी करण्यात येईल. पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या खेळत्या भागभांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या धर्तीवर व इतर प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज दरात चार टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येईल व त्यासाठी स्वयंस्पष्ट मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती विहित करण्यात येईल आणि कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यात येईल.

राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के आहे. कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के आहे. राज्यातील पशुजन्य उत्पन्नाचा विचार करता भारतीय आरोग्य परिषदेने दैनंदिन आहारात शिफारस केलेल्या प्रमाणाइतके अंडी व मांस उपलब्ध नाही. तसेच दुग्ध उत्पादनात राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता इतर राज्यांच्या तुलनेत कमी आहे. याशिवाय निती आयोगाच्या २०२१ च्या अहवालामध्ये पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पद्धतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असून त्यावर उपाययोजना करुन शेतकरी /पशुपालकांच्या आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली असल्याचेही पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले.

**डॉ. शंकरराव चव्हाण...**

होणार आहे. या समारंभास खा. डॉ. अजित गोपछडे, खा. रवींद्र चव्हाण, आ. हेमंत पाटील, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव तिडके बोंढारकर, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्पण सोहळ्यास कलाप्रेमी रसिक, श्रोते आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी केले आहे.

**'डिजिटल इंडिया'च्या नावे...**

९५ टक्के अनुदान ऑटोसाठी उपलब्ध करून देण्यात येईल. उर्वरित पाच टक्के रक्कम अर्जदारांनी ऑटो प्राप्तीच्या वेळी भरावी लागेल तसेच आरटीओ ऑफिस चालान, अर्ज करताना कार्यालयाची फीस भरावी लागेल. या व्यतिरिक्त कोणताही खर्च लागणार नाही अशी जाहिरात दिली. त्यासाठी आवश्यक कागदपत्रे म्हणून आधार, रेशनकार्ड, टीसीची मागणी करण्यात आली होती. जाहिरात आणि बॅनरबाजीनंतर नांदेड शहरातील हजारो नागरिकांनी या कार्यालयाकडे पैसे भरले होते. त्यांना वुमन्स अँड चाइल्ड डिपार्टमेंटची बनावट पावती देण्यात आली होती. काही दिवसानंतर योजनांचा लाभ मिळेल या आशेने पैसे भरणारे अनेक लोक तारासिंग मार्केट येथील कार्यालयास भेटी देत होते. त्यावेळी ऑटो या महिन्यात मिळेल, पुढच्या महिन्यात मिळेल तसेच वेगवेगळ्या कारणावरून त्यांना परत पाठवण्यात येत होते. अनेकांना उडवाउडवीचे उत्तरे देण्यात येत होती. अखेर या प्रकरणात विजय तुकाराम मडके यांनी वजीराबाद पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. मडके यांच्यासमवेत रवीसिंह हनुमानसिंह गहलोत यांच्याकडून बेरोजगार योजनेसाठी, सचिन जोंधळे, गजानन डुकरे यांच्याकडून ऑटोरिक्षा योजनेसाठी तर हरीश सखाराम कुंडकर यांच्याकडून बेरोजगार भत्ता यासाठी पैसे उकळण्यात आले.

**शासकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष :** महाराष्ट्र तसेच केंद्र शासनातील अनेक कार्यालयांची नावे घेऊन तसेच बनावट पावत्या करून हजारो नागरिकांची फसवणूक करण्यात आली. काही नागरिकांनी याबाबत शासकीय कार्यालयाकडे संपर्क साधला असता अशी कोणतीही योजना सुरू नसल्याचे त्यांना सांगण्यात आले; मात्र शासकीय कार्यालयांच्या नावे फसवणूक सुरू असताना तसेच शासकीय कार्यालयांच्या बनावट पावत्या दिल्या जात असताना शासकीय अधिकारी याकडे डोळेझाक करत होते. त्यामुळे नागरिकांची फसवणूक वाढत गेली. अखेर दोन वर्षानंतर का होईना या प्रकरणात नांदेड पोलीस अधीक्षकांनी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले.

**जनसुरक्षा विधेयक विधानपरिषदेत...**

हिंसक घटना घडल्यास लागू होतो. मात्र, सध्या नक्षलवादी विचारसरणी हिंसाचाराशिवायच शहरांमध्ये शिरकाव करत आहे. त्यामुळे त्यांच्या पद्धतीला थोपवण्यासाठी स्वतंत्र कायदा आवश्यक ठरतो. फक्त विचारांच्या आधारे दोष सिद्ध करणे यूएपीए अंतर्गत शक्य नसते.

विधेयकानुसार, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, जिल्हा न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आणि सरकारी वकील यांचा समावेश असलेले सल्लागार मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. या मंडळासमोर सर्व पुरावे सादर करण्यात येतील आणि त्यांची शिफारस मिळाल्यानंतरच संबंधित संघटनेवर बंदी घालण्यात येईल. याशिवाय, बंदी घालण्यात आलेल्या संघटनेचा सदस्य असलेल्या व्यक्तींवरही कायदेशीर कारवाई होणार आहे. गृहराज्यमंत्री कदम यांनी हा कायदा सामान्य आंदोलकांवर किंवा सरकारविरोधी मतप्रदर्शन करणाऱ्यांवर नाही, तर केवळ माओवादी विचारसरणीच्या फैलावावर नियंत्रण आणण्यासाठी असल्याचे यावेळी स्पष्ट केले.

विरोधकांचा सभात्याग : उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसह शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने या विधेयकाला जोरदार विरोध दर्शवला. सत्ताधाऱ्यांच्या जे पोटात आहे तेच त्यांच्या ओठावर असल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला. शेवटी सभात्याग करुन आपला या विधेयकाला विरोध असल्याचे सांगत ठाकरे गटाचे सर्व आमदार बाहेर पडले. नंतर सभागृहाबाहेर उद्धव ठाकरे यांनी या विधेकावरील शिवसेनेचा का विरोध आहे? तसेच सभागृहात नेमके काय घडले? याबाबतची भूमिका माध्यमांसमोर मांडली.

**निवडणुका आल्या..ईव्हीएम...**

आवश्यकता आहे. त्यामुळे ऐनवेळी होणारी धावपळ टळू शकेल. मतदारसंख्या, मतदार केंद्र, उपलब्ध इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि उपलब्ध मनुष्यबळ इत्यादींची आपल्या स्तरावरील उपलब्धता लक्षात घ्यावी. मतदान यंत्रांची प्राथमिक तपासणी झाल्यानंतर आवश्यक संख्येचा अंदाज घेता येईल. मनुष्यबळाबाबत विभागीय आयुक्तांनी समन्वयकाची भूमिका घेऊन सर्व महापालिका आयुक्तांसोबत वेळोवेळी आढावा घ्यावा. सर्व संबंधितांशी समन्वय आणि नियोजनपूर्वक तयारी केल्यास आपल्याला या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडणे सहज शक्य होईल, असे वाघमारे म्हणाले.

मतदाराची संख्या लक्षात घेऊन मतदान केंद्रांची अचूक संख्या निश्चित करता येईल. त्या आधारे पुढील नियोजन करणे सुलभ होईल. मतदान केंद्राचा अचूक अंदाज आल्यावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या आवश्यकतेबाबतही नियोजन करता येईल. मनुष्यबळाचाही अंदाज येईल. विभागीय आयुक्तांच्या समन्वयातून आजुबाजूच्या जिल्ह्यातील मनुष्यबळ उपलब्ध करून घेता येईल.




## महत्त्वाचे

### एकाच दिवशी तीन गुन्हे दाखल

**किनवट,दि.११:** किनवट पोलीस स्टेशन अंतर्गत तीन स्वतंत्र गुन्ह्यांची नोंद झाली असून, यामध्ये जुगार, कौटुंबिक छळ आणि बेकायदा दारू विक्रीप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. आरोपी नरसिमलू विजय कोतुरवार याला महात्मा फुले चौकामागील भाजी मार्केट परिसरात ''पद्मावती ओपन'' व ''श्रीदेवी ओपन'' जुगार खेळताना पकडले. फिर्यादी पोहेकॉ तुकाराम वाडगुरे यांच्या तक्रारीवरून कलम १२(अ) मजुका अंतर्गत गुन्हा दाखल. केला.आरोपी अजय दुघेवार (२२, रा.रामनगर) याला चिखली (खु.) येथे ४००० रु. किमतीच्या १०० सीलबंद देशी दारूच्या बाटल्या बाळगताना आढळून आला.गुन्हा दाखल झाला आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षेत आंदुरे राज्यात नववा

**मुखेड,दि.११:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत शिवम मनोजकुमार आंदुरे याने राज्यात नववा क्रमांक पटकावला व घवघवीत यश मिळविले. तो ऑक्सफोर्ड इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल नांदेडचा विद्यार्थी असून त्याने आपल्या यशाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद, भारगावकर ॲकेडमीचे मार्गदर्शक शिक्षक तसेच आपल्या आई वडिलांना दिले आहे.



### कापूस खरेदी करा –मागणी

**किनवट,दि.११ :** तालुक्यातील बहुतेक शेतकरी कापसाची शेती मोठ्या प्रमाणात लागवड करतात. या तालुक्यात शेतकऱ्यांचा उत्पादित कापूस खरेदी करण्यासाठी सीसीआयचे एकही खरेदी केंद्र नसल्याने खासगी व्यापाऱ्यांना कवडीमोल भावाने विकण्याची वेळ येत आहे. किनवट हा तेलंगणा सीमेवर असल्याने तेलंगणा राज्यातील सीसीआयच्या कापूस खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांचा उत्पादित कापूस खरेदी करावा, अशी मागणी केली आहे.

### वृद्धांना जीवनावश्यक किटचे वाटप

अर्धापूर,दि.११ :वृद्धाश्रमातील निराधार गरजू वृद्ध महिला पुरुषांना त्यांच्या दैनंदिन उपयोगातील जीवन आवश्यक किटचे वाटप करून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे याचा वाढदिवस राष्ट्रवादी काँग्रेस अर्धापूर तालुका अध्यक्ष आत्माराम पाटील कपाटे यांच्या वतीने''संध्या छाया''वृद्धाश्रम तरोडा नांदेड येथे साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर,अर्धापूर पंचायत समितीचे माजी सभापती बाबुराव हेंद्रे,चंद्रकांत टेकाळे,अनिकेत आवरदे उपस्थित होते.

### नांदेड जिल्हयात पावसाची उघडीप

**नांदेड,दि.११:** :जिल्हयात गेल्या आठवडयात सर्वत्र पाऊस पडला होता. परंतु दोन दिवसानंतर मात्र पावसाने चांगलीच उघडीप घेतली आहे. त्यामुळे मोठा दिलासा मिळू लागला आहे. सततच्या पावसामुळे नागरिक कंटाळले होते. शिवाय शेतीची कामेही पावसामुळे खोळंबली होती. आता पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकऱ्यांना कामे करता येत आहेत. शिवाय नागरिकांनाही आपले व्यवहार सुरळीत करता आले आहेत.

# बसस्थानकाला आले तळ्याचे स्वरुप

**देगलूर, दि. ११ : सततच्या पावसामुळे येथील जुना बसस्थानकाला तळ्याचे स्वरूप आले आहे. पाऊस पडला की, येथे तळे साचते, हे दरवर्षीचे चित्र आहे. मात्र, यावर ठोस उपाययोजना एसटी प्रशासन कधी करणार? असा प्रश्नचिन्ह आहे. प्रवाश्यांची होणारी फरफट कधी थांबवणार, असा सवाल प्रवाशांकडून केला जात आहे.**




शहरातील जुने बसस्थानक सततच्या पावसामुळे या ठिकाणी तळयाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. येथून शेजारच्या कर्नाटक, तेलंगना या प्रांताला बस ये-जा करत असतात. देगलूर हे महत्वपूर्ण ठिकाण आहे. येथील बसस्थानकाची दुर्दशा पाचविला पुजली आहे. दरवर्षी पाऊस पडतो अन् चिखल होतो. या ठिकाणी तळे साचते त्यात प्रवाश्यांची तारांबळ पहावयास मिळते. परंतु एस.टी.प्रशासन मात्र या बाबतची गंभीर दखल घेत नाही याचे नवल वाटते.

देगलूर शहरातील जुनं बसस्थानक हे कर्नाटक तेलंगाना राज्याला जाणाऱ्या प्रवाशांचे महत्त्वाचे स्थानक म्हणून ओळख आहे. मात्र, येथेच प्रवाशांना सुविधा मिळत नसल्याचे अनेकदा समोर आले आहे. पाऊस पडला की, येथील स्थानकाची इमारत गळते, स्थानक परिसरात मोठमोठे खड्डे पडतात आणि त्यात महत्त्वाचे म्हणजे येथे भले मोठे पाण्याचे तळेच साचते. यातून ये-जा करताना प्रवाशांना मोठी कसरत करावी लागते. याकडे एसटीच्या देगलूर आगाराच्या व्यवस्थापकांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. बस स्थानकाच्या परिसरातील खड्ड्यामध्ये बुधवारी झालेल्या पावसामुळे येथे भले मोठे पाण्याचे तळे साचले होते. त्यासोबतच येथील परिसरातील निकृष्ट दर्जाच्या कामाची देखील या पावसाने पोलखोल केल्याचे पाहायला मिळाले आहे. येथे भले मोठे खड्डे पडले आहेत. बुधवारी पाऊस उघडल्यावर प्रवाशांना ते पाहायला मिळाले, याच खड्ड्यांमधून बॅगांचे ओझे घेऊन प्रवाशांना जावे लागत आहे. यासाठी तातडीने आगार प्रमुखांनी जुना बस स्थानकातील लवकरात लवकर खड्डे बुजून प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी असे देगलूर तालुक्यातील प्रवाशांमधून बोलले जात आहे

## दि.मा.देशमुख यांच्या तीन पुस्तकांचे आज प्रकाशन

**नांदेड,दि.११ :** येथील ज्येष्ठ कवी दि. मा. देशमुख लिखित व श्रीकर प्रकाशन निर्मित अध्यात्म, आत्मगत व काव्यसंग्रह असलेल्या तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा दि.१२ जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. काबरानगर येथील गिरीराज सभागृहात सायंकाळी ५.३० वा. हा प्रकाशन सोहळा पार पडणार आहे.



प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष आणि प्रमुख वक्ते म्हणून संत साहित्याचे अभ्यासक व प्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. बा. ल.चौथवे महाराज उपस्थित राहणार आहेत. विशेष वक्ते म्हणून साहित्यिक प्रा. डॉ. दीपक कासराळीकर आणि राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शिवा कांबळे यांची उपस्थिती लाभणार आहे. या सोहळ्यात 'हरिपाठ-सारामृत', 'मागे वळून पाहताना' आणि 'शब्दचि ओलावले' ही दि.मा. देशमुख यांची तीन नवी पुस्तके प्रकाशित होणार आहेत. या साहित्यिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवलेखक जयंत वाकोडकर करणार आहेत. साहित्यप्रेमींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन वसंतराव देशमुख, भगवानराव देशमुख आणि श्रीकर प्रकाशनचे गिरीश कहाळेकर यांनी केले आहे.

# चिकाळा गावात साकारतेय शिवस्मारक

**तामसा,दि.११ :** हदगांव तालुक्यातील चिकाळा या छोट्याशा गावात मराठी अस्मितेचा मानबिंदू हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक साकार होत आहे. ही एक अभिमानाची गोष्ट असून हे शिवस्मारक नव्या पिढीला प्रेरणादायी ठरणार आहे.



**प्रेक्षणीय स्थळ**

चिकाळा गावात नव्या पीढीला प्रेरणा आणि स्फूर्ती देण्यासाठी शिवस्मारक उभारण्यात येत आहे. या स्मारकाचे काम अंतिम टप्प्यामध्ये आहे. हदगाव तालुक्यात एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून गणाल्या जाईल.

तामसापासून काही अंतरावर असलेल्या किमान हजार दोन हजार लोकवस्तीच्या चिकाळा गावात नव्या पिढीला प्रेरणा, स्फूर्ती देणारे शिवस्मारक उभारण्यात येत आहे. चिकाळा गावातील चौकात उभारण्यात येणाऱ्या शिवस्मारकाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या शिवस्मारक बांधकामाचा शुभारंभ १९ फेब्रुवारी २०२३ रोजी करण्यात आला होता.

गावातील तरुणांनी शिवजयंतीच्या निमित्ताने डीजे, नाचणे, व्यसनाच्या आहारी जाऊन विचित्र गाणे वाजाविण्याच्या कारणावरून गावात होणारे वाद, तंटे टाळून यामध्ये पैसे खर्च न करता विधायक कामासाठी त्या पैशाचा वापर करावा. या विचारातून लोकवर्गणीतून राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे अविस्मरणीय स्मारक उभारण्याची संकल्पना मांडली.

# दत्त मंदिरात गुरु पौर्णिमा उत्साहात साजरी

**नवीन नांदेड,दि.११ :** गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिनाचे औचित्य साधून सिडको, येथे गुरुदेव दत्त मंदिरात भाजपा प्रदेश कमिटी महिला मोर्च्याच्या सचिव प्रा. डॉ.ललिता बोकारे (शिंदे), व गुरूदेव दत्त महिला मंडळाच्या संयुक्त वतीने गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.



याप्रसंगी जेष्ठ सामाजिक, धार्मिक कार्यकर्त्यांसुरेखा अरुणराव नेरलकर यांचा साडी चोळी, शाल श्रीफळ देवून यथोचित सत्कार करण्यात आला. मंदीर समितीच्या अध्यक्षा ललिता बोकारे यांनी आपल्या प्रस्ताविकात आपल्या भारतीय संस्क्रूतीत गुरुचें महत्व विषद केले. सत्कार मूर्ती सुरेखा ताई नेरलकर यांनी शालेय बालक, किशोरवयीन मुलांना संस्कारक्षम मूल्य शिक्षण देणे आवश्यक आहे. यासंबधी माहिती दिली. यावेळी भजन, हरिपाठ, रामरक्षा, हरिपाठ यांचे सामूहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी भाजपा मोर्च्याच्या महिला पदाधिकारी सर्वस्वी ललिता बोकारे, संतोषी भाले, अनिता गज्जेवार, आशादेवी पताळे, अरुणा बंडेवार, सीमा गुंडाळे, अरुणा करडखेले यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. तसेच भजनी मंडळाच्या अध्यक्षा मीरा कोत्तावार, मधुबाला पूरी, गुरुमाय,देविका पोलशेटवार जयश्री गोनाकूडतेवार, संगीता पइतवार, सुरेखा जगदंबे पाटील, मुद्रिका व्यवहारे, लक्ष्मी चाडेवार,सुभद्राबाई. भोसले, सुशीला शिंदे, बेबी कणकापुरे, सुशीलाबाई मठपती या महिलांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले. उपस्थितांना मिठाई व चहापान व मिठाई, फळेवाटपा नंतर हा कार्यक्रम संपला.

# लोकसंख्या नियंत्रणासाठी शाळेची जनजागृती

**नांदेड, दि.११–** जागतिक लोकसंख्या वाढीशी संबंधित आव्हाने आणि संधींबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो. कुटुंब नियोजन, लिंग समानता, गरिबी, माता आरोग्य आणि शाश्वत विकास यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधतो. जागतिक लोकसंख्या दिन आपल्याला प्रत्येक व्यक्तीला आरोग्य, शिक्षण आणि पुनरुत्पादन आणि कौटुंबिक जीवनाबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळावे याची खात्री करण्याची आपली सामूहिक जबाबदारीची आठवण करून देण्यासाठी जवळा दे. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या चिमुकल्यांनी गावकऱ्यांचे लक्ष वेधले. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार, हैदर शेख, मनिषा गच्चे, संभाजी गवारे, इंदिरा पांचाळ आदिंची उपस्थिती होती.

आता जागतिक लोकसंख्या आठ अब्जांपेक्षा जास्त झाली आहे. तर उपलब्ध आकडेवारीनुसार, मागील जनगणनेदरम्यान देशातील सुमारे १८ टक्के लोकसंख्या वाढली आहे. जर भारताची लोकसंख्या याच वेगाने वाढली असण्याची शक्यता आहे. येत्या दोन वर्षांत भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश



बनेल. असे झाले तर देशात अन्न संकट, बेरोजगारीचे संकट, वैद्यकीय आणि आरोग्य संकट, जलसंकट मोठ्या प्रमाणावर निर्माण होईल. स्थलांतर, उपासमार यामुळे लोक हतबल होतील. नैसर्गिक समतोल भंग केल्यास भयंकर नैसर्गिक आपत्तींचा धोका निर्माण होईल, अशी माहिती मुख्याध्यापक ढवळे यांनी दिली. हीच यावर्षीची थीम असल्याचे बेंबडे म्हणाले.

## तीन पोलीस कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**देगलूर,दि.११ (ता.प्र.) :** देगलूर पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाचे अमलदार कृष्णा तलवारे व रिहाना शेख यांची पोलीस हेड कॉन्स्टेबलपदी आणि शिवाजी सूर्यवंशी यांची सपोउपनिपदी पदोन्नती झाली. त्यामुळे त्यांचा पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सपोनि अश्रुदेव पवार, पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड, गोपाल इंद्राळे, विशाल आटकोरे, विष्णू चामलवाड, मोटरगे, राजवीरसिंग बुंगई, रंजीत मुदीराज आदी उपस्थित होते.



# शेतकऱ्यांच्या पिकविम्यासाठी तरुणवर्ग सरसावला

**फुलवळ,दि.११ (वार्ताहर) :** कंधार तालुक्यातील फुलवळ येथे नवतरुनाकडून शेतकऱ्यांना पिकविमा भरुन देण्याचे काम येथील तरुण वर्ग करत आहेत.



मागील तीन वर्षापासून करत आहेत,मागील काही वर्षापासून शासनाने १ रुपये पिकविमा भरण्याची योजना आणली होती, त्यावेळेस गावातील काही नवतरुन युवकानी समाजात व गावात वावरत असताना आपल्या हातून गावची काही सेवा झाली पाहिजे हाच उदेश डोळ्यासमोर ठेऊन पिकविमा भरण्याचे काम हाती घेऊन शेतकऱ्यांना पिकविमा भरण्यासाठी लागनारा पेरा प्रमाणपत्र,डिजिटल होलडींग, पासबुकची झेरॉक्स प्रत,आधार आदि सर्व हे शेतकऱ्यांना मोफत व त्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रवाले पिकविमा भरुन ऑनलाईन करण्यासाठी १०० ते १५० रु. घेत होते ते भुर्दंड शेतकऱ्यांचे वाचले पाहीजे हा उदेश कंधार तालुक्यातील तरुण युवा वर्गाचा असल्याचे संतोष माधवराव मंगनाळे या युवकाने सांगितले.

या वर्षी शासनाकडून मोफत १ रुपयात विमा बंद केला असल्याने विमा कंपनीकडून सोयाबिन, कापूस, तूर, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी, आदि पिकांसाठी जे काही शेअर्स भरावे लागतात तेवढेच हे युवा तरुण शेतकऱ्यांकडून घेत आहे,बाकी सर्व मोफत संतोष मंगनाळे,शुभम फसमले,श्रीकांत मंगनाळे,रहीम शेख,धोंडीबा मंगनाळे,चंद्रकांत देवकांबळे आदी युवक करत आहेत. गावांत दवंडी देऊन सर्व शेतकऱ्यांनी या मोफत योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

### फसवणूक गुन्हा दाखल

**किनवट,दि.११ (ता.प्र.):** येथील रामनगरमधील संगीता मंडारे यांची ४९ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार त्यांनी किनवट पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. येथील चार जणांवर गुंतवणुकीच्या नावाखाली विश्वासघात व आर्थिक फसवणुकीचा आरोप आहे. तक्रारीनुसार, कार्तिका लँड डेव्हलपर्स प्रा.लि.च्या नावाने कार्यालय थाटून आरोपींनी दुप्पट परताव्याचे आमिष दाखवले. मात्र, पैसे परत न करता आरोपींनी टाळाटाळ केली. पोलिसांनी तक्रारदारांना पुरावे सादर करण्यास सांगितले.पुढील तपास सुरू आहे.

## शिबिरात ३०० जणांचे रक्तदान



**नांदेड,दि.११:** तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात संचालक, अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष धम्मगुरु संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या वाढदिवसानिमित्त विविध राष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

या उपक्रमात दिवसभर विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी भिख्खू संघासह अप्पर जिल्हाधिकारी पी. बोरगावकर, आंबेडकरवादी मिशनचे केंद्रप्रमुख दिपक कदम, रमेश सोनाळे, श्रीकांत गायकवाड, प्रफुल सावंत, सुरेश हटकर, नगरसेवक देवराव खंदारे, गंगाधर ढवळे, सुखदेव चिखलीकर, प्रभू सावंत, संदीप मांजरमकर, रविंद्र सोनकांबळे, प्रितम जोंधळे, जी. बी. सोनकांबळे, इंजी. भरत कानिंदे, टी,पी. वाघमारे, प्रा.साहेबराव इंगोले, प्रा. एस.एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, विलास वाठोरे, एस.एन.गोडबोले, सिद्धार्थ थोरात, प्रा. बापुराव वाटोडे, संजीव गोणारकर, अशोक लोकडे, चांदू लोकडे, मिलींद कांबळे, ॲड. हिरानंद गायकवाड, रवि बुरड, राजु खंदारे, बाळासाहेब मस्के, प्रमोद डोंगरे आदींची उपस्थिती होती.

## आकाशवाणी कॅज्युअल युनियनच्या नूतन राष्ट्रीय कार्यकारिणीची रविवारी निवड

**नांदेड,दि.११:** आकाशवाणी कॅज्युअल अनाउंसर अँड कंपेअर युनियन नवी दिल्लीच्या नूतन कार्यकारिणीची निवड उद्या रविवार दि.१३ जुलै रोजी होणार आहे, अशी माहिती युनियनचे विद्यमान सरचिटणीस, सुरतगड येथील श्रीपाल शर्मा यांनी दिली आहे.

दर तीन वर्षांनी युनियनच्या नवीन कार्यकारिणीची निवड नवी दिल्ली येथे होते. याच संदर्भात, १३ जुलै रोजी सकाळी युनियनची आमसभा होईल, ज्यात मागील कार्यकाळातील कामांवर आणि आगामी कार्यसूचीत असलेल्या मुद्द्यांवर खुली चर्चा केली जाईल. या आमसभेत भाग घेण्यासाठी नांदेडसह देशभरातील सुमारे ४० आकाशवाणी केंद्रांमधून शेकडो युनियन सदस्य दिल्लीत पोहोचतील.

युनियनचे अध्यक्ष हरिकृष्ण शर्मा यांनी सांगितले की, नवीन कार्यकारिणीच्या पारदर्शक निवडणुका घेण्यासाठी छतरपूर येथील समीर गोस्वामी, बिलासपूर येथील सुनील चिपडे आणि हिसार येथील डॉ. नरेंद्र चहल यांची निवडणूक निरीक्षक म्हणून एकमताने निवड करण्यात आली आहे. या निवडणुकीदरम्यान युनियनचे अध्यक्ष, सरचिटणीस, कोषाध्यक्ष, चार उपाध्यक्ष (दोन महिला, दोन पुरुष), विविध कार्यक्षेत्रांसाठी आठ सचिव आणि तीन कार्यकारिणी सदस्य निवडले जातील.१३ जुलै रोजी निवडणुका झाल्यानंतर युनियनच्या सर्व कार्यांची जबाबदारी नवीन कार्यकारिणीकडे सोपवण्यात येईल.

तरी देशभरातील जास्तीत जास्त कॅजुअल अनाउन्सर, कॉम्पीयर्सनी उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष हरीकृष्ण शर्मा व सरचिटणीस श्रीपाल शर्मा यांनी केले आहे.


**CHANGE IN NAME**

My Old Name is Sk Chandpasha Which now I am. Changing as New Name. Shaikh Chandpasha Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.

**:: Address ::**

**S/o Shaikh Musa BilalNagar Tamsa**

**Mob. 9049842102**

**CHANGE IN NAME**

My Old Name is Najemabegam Which now I am. Changing as New Name. Shaikh Najima Shaikh Chandpasha Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.

**:: Address ::**

**W/o Shaikh Chandpasha Bilalnagar Tamsa**

**Mob. 9049842102**

**मातोश्री हॉस्टेल व अभ्यासिका विकणे आहे**

चालू सेटअप विकणे आहे. सामान व्हीआयपी अभ्यासिका, फर्नीचर, ए/सी इन्हेटर, व्हीआयपी चेअर, डबल बेड, कुलर, वॉशिंग मशीन ,गीझर, वायफाय सुविधा उपलब्ध आहे.

**:: संपर्कासाठी पत्ता::**

**संदिप अंबादास शिंदे पाटील**

**मो.८८३०२९३०५९,८७९३११९६११**

## सुविचार

स्वभाव पेढ्यासारखा पाहिजे जो राजवाड्यात जेवढी चव देतो, तेवढीच चव झोपडीत पण देतो.

## संपादकीय

# सुदृढ लोकशाहीसाठी...!

**पावसाळी** अधिवेशनात गुरुवारी विधानसभेत आणि शुक्रवारी विधानपरिषदेत महाराष्ट्र सरकारने ऐतिहासिक असे जनसुरक्षा विधेयक मांडले. आणि ते दोन्ही सभागृहात संमत झाले. या विधेयकामुळे आता देशविरोधी, महाराष्ट्रविरोधी तसेच समाज विघातक कृत्य करणाऱ्या समाजकंटकांवर, नक्षलवाद्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात ते मंजूर झाल्याने आता राज्यपालांकडे संमतीसाठी पाठवले जाईल. राज्यपालांनी त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर त्याचे जनसुरक्षा कायद्यात रूपांतर होईल आणि अधिकृत कायदा राज्यात लागू होईल. महत्वाचे म्हणजे, या कायद्यांतर्गत आंध्र प्रदेश, झारखंड आणि तेलंगणा या राज्यांतील ४८ संघटनांवर बंदी आली आहे. तथापि, महाराष्ट्रात अशा प्रकारचा कायदा नसल्यामुळे शेजारच्या राज्यांतील ज्या संघटनांवर बंदी आहे, अशा संघटना महाराष्ट्रात कार्यरत असल्याचे गेल्या काही वर्षांत लक्षात आले होते. त्यांची संख्या ६४ इतकी आहे. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, गडचिरोली, अमरावती, बीड येथे या संघटना सक्रिय आहेत, अशी माहितीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. त्यांनी यावेळी केंद्र सरकारने बंदी घातलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष-माओवादी संघटनेचे उदाहरण सुद्धा दिले. या संघटनेची घटना आणि घटनेतील उद्दिष्ट वाचून दाखवत त्यांनी देशासमोरील धोका स्पष्ट केला. केंद्र सरकारने गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राने असा कायदा करावा अशी अपेक्षा ठेवली होती. अंतर्गत सुरक्षेसाठी केंद्र सरकारकडून राज्यांना निधी दिला जातो. त्या योजनेमध्ये केंद्राकडून अंतर्गत सुरक्षेसाठी निधी मिळवणाऱ्या राज्याने असा सक्षम कायदा करावा अशी अपेक्षा केली जात होती. ती आता पूर्ण झाली आहे. भविष्यात निर्माण होणाऱ्या या कायद्यामुळे नक्षली चळवळींना मोठा हादरा बसणार आहे. या कायद्यांतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटना व्यक्ती तसेच नक्षलवादी आणि माओवादी संघटनांवर कारवाई केली जाणार आहे. जनसुरक्षा कायदा हा एक अजामीनपात्र आणि प्रतिबंधात्मक कायदा आहे. या कायद्यानुसार, जर सरकारला वाटत असेल की, एखादी व्यक्ती सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी किंवा राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका आहे, तर त्या व्यक्तीला कोणत्याही आरोपाशिवाय ताबडतोब ताब्यात घेतले जाऊ शकते. जनसुरक्षा कायद्यातील तरतुदींनुसार एखाद्या संघटनेला बेकायदेशीर संघटना जाहीर करता येऊ शकेल. तसेच त्या संघटनेचे कार्यालय, परिसर, इतर संपत्ती जप्त करता येईल. बेकायदा जाहीर झालेल्या संघटनांची बँकांमधील खाती गोठवता येतील. संघटनेला बेकायदा ठरवण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या समकक्ष तीन सदस्यीय सल्लागार मंडळ असेल. सल्लागार मंडळाच्या परवानगीनंतरच एखाद्या संघटनेला बेकायदा जाहीर करता येईल. त्यामुळे एखाद्या अधिकाऱ्याची मनमानी चालली असे आरोप करण्याला जागा राहणार नाही. किमान पोलीस उपाधीक्षक दर्जाचा अधिकारीच या गुन्ह्याचा तपास करेल आणि अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या परवानगीनेच या गुन्ह्यांमध्ये आरोपपत्र दाखल करता येईल. त्यामुळे कायद्याचा गैरवापर होणार नाही याची काळजी सरकारकडून घेतली जात आहे. बंदी घातलेल्या संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते नव्या नावाने संघटना उभारून तेच कार्य करत असतील, तर नवी उभारलेली संघटना ही मूळ बेकायदा संघटनेचा भाग मानली जाईल आणि ती ही बेकायदा ठरेल. महाराष्ट्रात स्वतःचा स्वतंत्र कायदा बनवण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती. देशातील काही नक्षलग्रस्त राज्यांमध्ये असा विशेष कायदा आधीपासूनच अस्तित्वात आहे. परंतु, महाराष्ट्रात असा कायदा नसल्याने पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांना यूएपीएसारख्या केंद्र सरकारच्या कायद्यांचा आधार घ्यावा लागतो. आता राज्याचा स्वतंत्र कायदा तयार झाल्यानंतर त्यानुसार कारवाई करणे अधिक सोपे होणार आहे. महाराष्ट्राने गेल्या ४० वर्षांपासून माओवादाशी जंगलात लढा दिला. पण, शहरी भागात ५० वर्षांपासून कार्यरत माओवादी संघटनांवर कोणतीही कारवाई होत नव्हती. अलीकडच्या काळात शहरी भागात नक्षलींचे जाळे मोठ्या प्रमाणात वाढल्याचे आरोप वारंवार केले जात आहेत. त्यामुळे त्यावर कारवाई अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आणि ती वेळीच केली नाही, तर राज्याच्या सामाजिक व्यवस्थेसमोर गंभीर संकट निर्माण होऊ शकते, अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते. संविधान आणि लोकशाही न मानणाऱ्या माओवादी फ्रंटल संघटनांवर कारवाई हाच या प्रस्तावित कायद्याचा मुख्य गाभा आहे, असे तज्ज्ञ सांगतात. आपला देश भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या राज्यघटनेच्या मजबूत पायावर उभा आहे आणि माओवाद नेमकी हीच राज्यघटना नष्ट करण्याचा प्रयत्न करत असतात. बहुपक्षीय लोकशाही, त्यानुसार होणाऱ्या विविध निवडणुका, मतदानाचा अमूल्य अधिकार, विचारस्वातंत्र्य, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य, न्यायव्यवस्था हे माओवाद्यांना मान्य नाही. सर्व फुटीर शक्ती एकत्र आणणे आणि त्यातून देशाच्या प्रगतीला बाधा आणणे, कायम अशांतता ठेवणे हेच त्यातून साध्य केले जाते. माओवादी फ्रंटल संघटनेची कार्यपद्धती वैविध्यपूर्ण आणि गुंतागुंतीची आहे. विविध न्यायालयांनीसुद्धा अशा घटनांत यूएपीएच्या मर्यादांवर बोट ठेवलेले होते. त्यामुळेच अशा प्रकारचा स्वतंत्र कायदा ही राज्याची गरज होती. त्यातून खऱ्या अर्थाने अशा घटनांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती हाताळण्यास मदतच होणार आहे. लोकशाहीविरोधी माओवादी संघटनांनी गेल्या ५० वर्षांत देशाच्या नक्षलग्रस्त राज्यांत हजारो सुरक्षा जवान, पोलीस आणि शेकडो आदिवासी बांधवांचे प्राण घेतले आहेत. आज केंद्र आणि राज्य सरकारे या नक्षलवादाविरुद्ध कठोर कारवाई करत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी येत्या वर्षभरात संपूर्ण देश नक्षलवादमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. आणि त्यांच्या या संकल्पाला यश येत असल्याचे दिसत आहे. सुरक्षा दलांच्या विविध अभियानात नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले जात आहे. त्यामुळे अलीकडच्या काही महिन्यांत नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. अनेक माओवादी शस्त्रे टाकून शरणागती पत्करुन मुख्य प्रवाहात येत आहेत. आता ग्रामीण भागातून किंवा जंगलातील हा माओवाद शहरी नक्षलवाद या नावाने नवी खेळी करण्याच्या प्रयत्नात आहे. हा सर्वाधिक धोकादायक असलेला नक्षलवाद मोकाट सुटू नये, त्यावर वेळीच पायबंद बसावा यासाठी हा जनसुरक्षा कायदा महत्वाचा आणि आवश्यक आहे. सुदृढ लोकशाहीसाठी टाकलेले हे एक महत्वाचे पाऊल आहे.

हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक शिवानंद दिंगबरराव महाजन द्वारा प्रकाशित आणि मुद्रक संदीप विलासराव पाटील, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२

**संपादक : शिवानंद दिंगबरराव महाजन**

**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**

या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.

https://epaper.esatyaprabha.com

र.क्र.२७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०

e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

**आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्षामध्ये महाराष्ट्र-गुजरातपुरते मर्यादीत सहकाराचे जाळे देशभर नेण्यासाठी केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा सहकारी चळवळीच्या बळकटीकरणाला प्राधान्य देत असून काही बदल घडवून आणत आहेत. या क्षेत्राने कार्यक्षमता आणि विश्वासार्हतेच्या बाबतीत कॉर्पोरेट क्षेत्राशी उत्तम स्पर्धा करावी, असा यामागील हेतू आहे. मात्र सहकाराचा दुभत्या गाईसारखा वापर करून न घेता ठोस प्रयत्न करणे गरजेचे आहे.**

# बळकटी हवी



आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त नुकतीच नवी दिल्लीमध्ये 'मंथन बैठक' आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत देशभरातील सहकार मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि सहकार विभागांचे सचिव सहभागी झाले होते. या बैठकीत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी घोषणा केली की राष्ट्रीय सहकार धोरण लवकरच लागू केले जाईल. ते २०२५ ते २०४५ या कालावधीत देशातील सहकारी क्षेत्राला मार्गदर्शन करेल. प्रत्येक राज्य आपल्या स्थानिक गरजा आणि परिस्थितीनुसार सहकारी धोरण बनवेल. मंथन बैठकीत सहकार चळवळ मजबूत करण्यावर भर देण्यात आला. बैठकीत नैसर्गिक शेती, ग्रामीण रोजगारनिर्मिती आणि सहकारी संस्थांचा विस्तार यावर विशेष भर देण्यात आला. देशातील मोठ्या लोकसंख्येकडे मर्यादित संसाधने आहेत आणि त्यांच्या लहान भांडवलाचे मोठे काम करण्यासाठी एकत्रितपणे सहकार्य करणे शक्य आहे. राष्ट्रीय सहकारी डेटा संकलन प्रणाली (डेटाबेस) द्वारे देशातील कोणत्या गावांमध्ये अद्याप कोणतीही सहकारी संस्था नाही, हे शोधणे शक्य होईल. येत्या पाच वर्षांमध्ये देशात असे एकही गाव नसेल, जिथे सहकारी संस्था नसेल, असे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्रिभुवन सहकारी विद्यापीठाच्या माध्यमातून सहकारी क्षेत्रात प्रशिक्षण आणि क्षमता विकासाची व्यवस्था केली जात आहे. प्रत्येक राज्याने किमान एक प्रशिक्षण संस्था या विद्यापीठाशी जोडावी, असा शहा यांचा आग्रह आहे. तशी विनंती त्यांनी राज्यांना केली. बैठकीत यावरही चर्चा झाली. या बैठकीत दोन लाख बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्था (एम-पॅक्स) स्थापन करणे, दूध आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा विस्तार, देशातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना आणि श्वेत क्रांती २.० यासारख्या उपक्रमांवरही चर्चा झाली.

या बैठकीमध्ये भारतीय बियाणे सहकारी संस्था सारख्या नव्याने स्थापन झालेल्या संस्थांच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. याव्यतिरिक्त, राष्ट्रीय सहकारी निर्यात संघटना, राष्ट्रीय सहकारी सेंद्रिय संघटना आणि भारतीय बियाणे सहकारी संस्थेसारख्या नव्याने स्थापन झालेल्या संस्थांच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. सहकारी बँकांमध्ये अधिक पारदर्शकता आणली जाईल आणि त्यांच्या कामकाजाचे जीत जास्त संगणकीकरण केले जाईल, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला. देशात सुमारे २.७ लाख ग्रामपंचायती आहेत; परंतु अनेक पंचायती अद्याप पीएसीएस, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या अंतर्गत येत नाहीत. देशाच्या एकूण आणि संतुलित विकासात या सहकारी संस्थांनी बजावलेल्या भूमिकेमुळे सरकारने ग्रामपंचायतींमध्ये नवीन बहुउद्देशीय पीएसीएस, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या स्थापनेच्या योजनेला मान्यता दिली आहे. कालबद्ध पद्धतीने त्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सहकार मंत्रालयाने 'नाबार्ड', 'एनडीडीबी' व 'एनएफडीबी'च्या सहकार्याने मार्गदर्शिका तयार केली आहे. यामुळे त्यांच्याशी संबंधित कोट्यवधी लहान आणि सीमांत शेतकऱ्यांच्या उत्कर्षाचा मार्ग मोकळा होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचा बहुउद्देशीय परिणाम होईल.

'व्हाईट रिव्होल्यूशन २.०' उपक्रमाबरोबरच महिलांना सक्षम बनवणे, रोजगारनिर्मिती करणे आणि सहकारी व्याप्ती वाढवणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. पाचव्या वर्षाच्या अखेरीस दुग्ध सहकारी संस्था दररोज दहा कोटी किलोग्राम दूध खरेदी करतील. त्यामुळे ग्रामीण उत्पादकांचे जीवनमान लक्षणीयरीत्या वाढेल असा अंदाज आहे. या उपक्रमामुळे दुग्ध प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा विकास निधी (डीआयडीएफ), दुग्ध विकासासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (एनपीडीडी), तसेच पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाच्या प्रस्तावित योजनेच्या 'एनपीडीडी' यासारख्या योजनांचा फायदा होईल. पुढील पाच वर्षांमध्ये सहकार मंत्रालयाने सत्तर हजार नवीन बहुउद्देशीय 'पीएसीएस' स्थापन करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. पंचायत किंवा गाव पातळीवर सुलभ कर्ज आणि इतर सेवांची उपलब्धता सुनिश्चित केली जाईल. देशात दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था (पॅक्स) स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी प्रत्येक गावात सहकारी संस्थांची माहिती डिजिटल डाटाबेसद्वारे संकलित करण्यात आली आहे. पॅक्स संस्थांना केवळ कृषीपुरते मर्यादित न ठेवता २२ नव्या सेवा क्षेत्रांशी जोडण्यात येत आहे. यामध्ये जनऔषधी केंद्रे, गॅस वितरण, पेट्रोल पंप, रेल्वे तिकिट सेवा, टॅक्सी सेवा अशा सेवा क्षेत्रांचा समावेश आहे.

**- हेमंत देसाई**


देशात सहकारी चळवळ खऱ्या अर्थाने रुजली ती गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण तसेच अमूल उद्योग समूहाचे वर्गिस कुरियन प्रभृतींनी भारतातील सहकारी चळवळीतील योगदानाचे मुख्य श्रेय वैंकुंठभाई मेहता यांचेच असल्याचे म्हटले आहे. वैकुंठभाईंच्याच बरोबर कृषिमहर्षी विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील यांचीही सहकार चळवळीतील कामगिरी ऐतिहासिक होती. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरणाच्या काळात सहकारी चळवळ नामशेष होईल, अशी भीती व्यक्त केली जात होती. महाराष्ट्रात तर सहकार म्हणजे स्वाहाकार असे एक समीकरण तयार झाले होते. परंतु आता केंद्र सरकारने सहकारासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन केले असून 'सहकार से समृध्दी' या आधारावर ग्रामीण भागात परिवर्तन आणले जात आहे.

प्राथमिक सहकारी पतसंस्थांची उलाढाल वाढावी आणि थेट लाभ हस्तांतरण, व्याजसवलत योजना, पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीचे काम पाहणारी मध्यवर्ती संस्था म्हणून सहकार खात्याने काम करावे, अशी अपेक्षा आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या ४०० कल्याणकारी योजना, प्रकल्प व सेवा आहेत. हे सर्व काम प्राथमिक पतसंस्थांवर सोपवायचे झाल्यास, त्या बळकट कराव्या लागतील. हे लक्षात घेऊनच नवीन पतसंस्था स्थापन केल्या जाणार आहेत. सध्या अनेक पतसंस्था या अकार्यक्षम असून राजकीय हेतूनेच उभ्या रहात आहेत. यासाठी प्रथम या संस्थांचा कारभार पारदर्शक करावा लागेल. सहकारी पतसंस्थांवर देखरेख करण्याचे काम हे नाबार्ड, रिझर्व्ह बँक आणि सहकारी खात्याने अधिक प्रभावीपणे करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि अन्य राज्यांमध्ये मिळून देशातील सहाकारी क्षेत्रात ३० कोटी लोक गुंतले आहेत. प्राथमिक कृषी पतसंस्थांची एकूण उलाढालच आठ लाख कोटी इतकी आहे. तर जिल्हा व नागरी सहकारी बँकांची उलाढाल पाच लाख कोटी रुपयांची आहे. ही उलाढाल ३० लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे सरकारचे ध्येय आहे. कार्यक्षमता व विश्वासार्हता या बाबतीत सहकारी क्षेत्राने कॉर्पोरेट क्षेत्राशी उत्तम स्पर्धा करावी, असा यामागील हेतू आहे. सहकाराचा दुभत्या गाईसारखा वापर करून घेण्याची प्रवृत्ती थांबणे मात्र गरजेचे आहे. त्या दिशेने काही प्रयत्न होत असतील, तर ते चांगलेच आहे.

(अद्वैत फीचर्स)

## श्रध्दा-संस्कृती

# अंतराळातही भूकंप होतो का ?



भूकंप ही एक अशी नैसर्गिक आपत्ति असते ज्याची सर्वांनाच भीती वाटते. जमीनीसकट सगळंच हादरवणाऱ्या या भूकंपाची सगळ्यांच्याच मनात भीती असतेच. सहसा, जेव्हा जेव्हा भूकंप होतो तेव्हा आपल्या मनात पहिला विचार येतो की या काळात पृथ्वी कंप पावते, ज्यामुळे मोठा विनाश होतो. इमारती, शाळा, ऑफीसेस, दुकानं पडझडीमुळे अनेक गोष्टींचं नुकसान होतं, झाडं कोसळतात, वित्तहानी तर होतेच पण मनुष्यहानी, जीवितहानी होण्याचाही धोका असतोच. जसा भूकंप होतो, तसंच तुम्ही स्पेसक्वेक बद्दल ऐकलं आहे का ?

स्पेसक्वेक म्हणजे काय ?

ज्याप्रमाणे आपल्या पृथ्वीवर भूकंप होतात, तसेच अवकाशातही भूकंप होतात, ज्यांना अवकाशकंप असं म्हणतात. मात्र, अंतराळात भूकंप होण्याचे कारण पृथ्वीवरील भूकंपांपेक्षा पूर्णपणे वेगळं असतं. खरंतर, पृथ्वीवरील भूकंप टेक्टोनिक प्लेट्समुळे होतात. जेव्हा पृथ्वीच्या आतील टेक्टोनिक प्लेट्स एकमेकांवर आदळतात तेव्हा आपल्याला हादरे जाणवतात, आपण त्यांना भूकंप म्हणतो. मात्र असंच हे अंतराळात घडत नाही.

अंतराळात भूकंप होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे चुंबकीय क्षेत्रात ऊर्जेची जास्त हालचाल, ज्याचा आपल्या पृथ्वीवरही परिणाम होतो. खरं तर, आपल्या पृथ्वीभोवती एक शक्तिशाली चुंबकीय क्षेत्र आहे, ज्याला मॅग्नेटोस्फीअर म्हणतात.

अंतराळातून किंवा अवकाशातून येणाऱ्या हानिकारक किरणांपासून आणि सौर किरणांपासून पृथ्वीचे संरक्षण करणे हे मॅग्नेटोस्फीअर किंवा या चुंबकीय क्षेत्राचे काम असते. तथापि, कधीकधी सूर्याकडून येणाऱ्या सौर वाऱ्यांचा प्रवाह इतका वेगवान होतो की ते चुंबकीय क्षेत्रावर आदळतात, ज्यामुळे खेचलं जातं, ताण निर्माण होते. यामुळे अवकाशातील किंवा अंतराळातील भूकंप होतात.

सहसा, पृथ्वीवरील भूकंपांमुळे अनेक प्रकारचे नुकसान होते, ज्यामध्ये झाड, इमारती कोसळणे आणि जमिनीवर भेगा पडणे यांचा समावेश होतो. तथापि, अवकाशातील भूकंपांमुळे विद्युत चुंबकीय लाटा निर्माण होतात, ज्या उपग्रह, पॉवर ग्रिड, दूरसंचार यावर परिणाम करतात.

## लाईफस्टाईल

# चहा प्यायल्याने ॲसिडिटी वाढते का?

भारतीय आणि चहाचं रोजचं नातं आहे. चहाशिवाय अनेकांची दिवसाची सुरुवात होत नाही. सकाळी उठल्यावर चहाचे दोन घोट घेतल्यानंतर फ्रेश वाटतं. त्यामुळे अनेक जण सकाळी उठल्याबरोबर चहाचा कप तोंडाला लावतात. पण उपाशी पोटी चहा प्यायल्याने आरोग्यावर काय परिणाम होऊ शकतो माहिती आहे का? यामुळे पोटात आम्लता वाढते. यामुळे पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे तुम्हाला चहा पिण्याची सवय असेल तर काही गोष्टी लक्षात ठेवणं आवश्यक आहे. जर या नियमांचं पालन केलं तर नक्कीच आरोग्याचं नुकसान होणार नाही. एम्स दिल्लीत गॅस्ट्रोलॉजी विभागाच्या माजी डॉ. अनन्य गुप्ता यांच्या मते, जेव्हा तुम्ही झोपेतून उठता तेव्हा तुमचा पोट रिकामी असतं. यामुळे पोटात गॅस्ट्रिक ज्यूस म्हणजेच ॲसिड अधिच सक्रिय असते. अशा वेळी तुम्ही जर चहा (दूध असलेला चहा) घेता तेव्हा ॲसिड वाढतं. त्यामुळे ॲसिडिटी, पोटात जळजळ, गॅस आणि ब्लोटिंगसारखी समस्या होते.



चहामध्ये कॅफीन आणि टॅनिन असते. त्यामुळे पचन प्रक्रिया खराब होऊ शकते. टॅनिनमुळे पचनप्रक्रिया मंद होते आणि भूक मरते. यामुळे उपाशी पोटी चहा घेतल्याने नैसर्गिक प्रक्रियेला नुकसान होऊ शकतं. यामुळे गॅस्ट्रिक समस्या वाढण्याची शक्यता असते. सकाळी चहा प्यायल्याने पोट भरल्यासारखं वाटतं. तसेच आंबट ढेकर आणि गळ्यात जळजळ होते. भूक लागत नाही आणि जेवायची इच्छा राहात नाही. दुपारपर्यंत पोटात गॅस आणि ब्लोटिंग राहते. जर अशी लक्षणं वारंवार दिसत असतील तर सकाळचा चहा तुमच्यासाठी चांगला नाही.

पोषण तज्ज्ञांच्या मते, ''जर सकाळी रिकाम्या पोटी चहा पिण्याची सवय बराच काळ राहिली तर त्यामुळे पोटातील तीव्र आम्लता आणि जठराची सूज यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.''ॲसिडिटीपासून वाचण्यासाठी चहा पिण्यापूर्वी काहीतरी खा. भिजलेले बदाम, केळं किंवा सुखा टोस्ट खा. चहासाठी पर्याय शोधा. हर्बल किंवा ग्रीन टी प्या. यामध्ये कॅफीनचं प्रमाण कमी असतं. सकाळी कोमट पाणी किंवा लिंबू पाणी पोट शांत करतं. जर चहा प्यायचाच झाला तर नाश्ता करताना किंवा केल्यानंतर प्या.

## मनोरंजन

# क्यूंकी सास भी कभी बहू थी

लोकप्रिय टीव्ही शो क्यूंकी सास भी कभी बहू थीचा दुसरा सीझन लवकरच टीव्हीवर प्रसारित होणार आहे. २५ वर्षांनंतर स्मृती इराणी यांना तुलसीच्या भूमिकेत पाहून चाहते खूप आनंदी आहेत.

स्मृती इराणी आणि स्टार प्लसच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटने शोचा पहिला लूक रिलीज केला आणि लिहिले, ''तुम्हाला अजूनही विश्वास बसत नाहीये का? २५ वर्षांनंतर, तुलसी विराणी एका नवीन कथेसह परत येत आहे. क्यूंकी सास भी कभी बहू थी पुन्हा एकदा प्रत्येक घराचा भाग बनण्यास तयार आहे, तुम्हीही तयार आहात का?''

पहिल्या लूकसोबतच, स्टार प्लस आणि स्मृती इराणी यांनी शोची रिलीज डेट जाहीर केली आहे. हा शो २९ जुलैपासून दररोज रात्री १०:३० वाजता स्टार प्लस आणि जिओ हॉटस्टारवर प्रसारित होईल.

रिलीज झालेल्या पहिल्या लूकमध्ये, स्मृती



इराणी तुलसी विराणीच्या भूमिकेत पूर्वीप्रमाणेच अंगणात असलेल्या तुळशीच्या रोपाला पाणी घालताना दिसत आहेत. टीझरची सुरुवात एका कुटुंबाने केली आहे की तुलसी इतक्या वर्षांनी राजकारणात गेली आहे का. ती आता टीव्हीवर परत येईल की नाही यावर चर्चा करत आहे.

आम्ही तुम्हाला सांगतो की, क्यूंकी सास भी कभी बहू थी हा टीव्ही शो भारतीय टीव्ही इंडस्ट्रीतील सर्वात लोकप्रिय शोपैकी एक आहे. पहिला सीझन ३ जुलै २००० रोजी सुरू झाला. हा शो २००८ पर्यंत चालला. ८ वर्षांत त्याचे १८३३ भाग प्रसारित झाले. एकता कपूरच्या या शोमध्ये स्मृती इराणी, अमर उपाध्याय, रोनित रॉय, मंदिरा बेदी, सुधा शिवपुरी, जया भट्टाचार्य, हितेन तेजवानी, गौरी प्रधान यांच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या.

या सीझनमध्ये स्मृती इराणी आणि अमर उपाध्याय मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. गेल्या सीझनमध्ये अमर उपाध्याय नंतर मिहिरची भूमिका साकारणारे रोनित रॉय यांनी टीव्हीवर परतण्यास नकार दिला आहे.

## श्रध्दा-संस्कृती

# रात्री स्मशानभूमीच्या परिसरात का जाऊ नये?

व्यक्तीचा मृत्यू झाला की अंत्यसंस्कार करण्यासाठी संबंधित मृतदेहाला थेट स्मशानभूमित नेले जाते. स्मशानभूमीत नेऊन त्या मृतदेहावर यथोचित अंत्यसंस्कार केले जातात.

बेवारस मृतदेह असला तरी त्याला स्मशानतच नेऊन त्याच्यावर विधिवत अंत्यसंस्कार केले जातात. मानवाच्या मृत्यूपश्चात याच स्थानावरून त्याच्या मुक्तीचा प्रवास चालू होतो, असे म्हटले जाते.

मात्र रात्रीच्या वेळी चुकूनही स्मशानभूमीच्या आसपास नये, असे सांगितले जाते. यामागे नेमके कारण काय आहे? असा प्रश्न अनेकदा विचारला जातो.

विष्णू पुराणात याचं कारण दिलेलं आहे. रात्रीच्या वेळी चुकूनही स्मशानाच्या आसपास नये असं विष्णू पुराणात सांगितलेलं आहे. मान्यतेनुसार स्मशानभूमीच्या आजूबाजूला नकारात्मक ऊर्जा असते.

स्मशानाच्या बाजूबाजूने ही नकारात्मक ऊर्जा अधिकच सक्रीय असते. त्यामुळेच रात्रीच्या वेळी स्मशानाच्या आजूबाजूने जाऊ नये, असे म्हटले जाते.

वरच्या लेखातील माहिती ही प्राथमिक स्वरुपाची आहे. आम्ही या माहितीची पुष्टी करत नाही किंवा समर्थनही देत नाही. या लेखाच्या माध्यमातून अंधश्रद्धा पसरवण्याचा आमचा उद्देश नाही. वरच्या लेखात दिलेल्या माहितीवरून कोणताही निर्णय घेण्याआधी त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला आवश्य घ्या.





# ‘गेमचेंजर’ नेत्यासाठी पडद्याआड फिल्डिंग

## महायुती, महाविकास आघाडीच्या घटक पक्षांत युवा नेतृत्वाला संधी


गजानन कुरुंडे

**गजानन कुरुंडे, धर्माबाद –**

**आगामी काळात होणार असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे धर्माबाद शहर व तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवण्याची चाचपणी सुरू केली आहे. यासह जिल्हा परिषद आणि नगर परिषदेतील सत्तेसाठी व्यूहरचना आखली जात आहे. स्थानिक स्तरावर प्रभावी ठरणाऱ्या ‘गेमचेंजर’ लोकल लीडर्ससाठी पडद्याआडून फिल्डिंग लावली जात असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.**


शंकर बोलमवाड वैभव कुलकर्णी

स्थानिक निवडणुकांचे वैशिष्ट्य म्हणजे येथे पक्षांपेक्षा कार्यकर्त्यांचे वजन अधिक असते. स्थानिक प्रश्न, लोकभावना आणि कामांची प्रामाणिक जाणीव हीच यशाची गुरुकिल्ली ठरते. त्यामुळे आता कार्यकर्त्यांना योग्य संधी देण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. वरिष्ठ नेत्यांच्या निवडणुकीत युती करून सत्तेकडे वाटचाल केली जाते. पण कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत मात्र ‘स्वबळा’चा नारा देत जुने गठबंधन मोडले जाते. यामुळे अनेक कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. नेत्यांसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळणार की नाही?, हा प्रश्न सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

दरम्यान, मागील काळात धर्माबादच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. काही वरिष्ठ नेत्यांनी पक्षांतर केल्यामुळे मतदारांचा गोंधळ उडाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कै. विनायकराव कुलकर्णी यांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव वैभव कुलकर्णी पक्षात नवा जोम आणतील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपमध्ये चुरशीची लढत झाली होती. पण काँग्रेसचा झेंडा नगराध्यक्षपदावर फडकला. आता काँग्रेसच्या काही नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे भाजपची ताकद वाढली आहे. खा. अशोकराव चव्हाण व आ. राजेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप आता अधिक आक्रमकपणे निवडणूक रिंगणात उतरत असल्याचे चित्र आहे.

भाजपमध्ये इच्छुक उमेदवारांची सोशल मीडियावर चांगलीच चर्चा सुरू आहे. यामध्ये विशेषतः शंकर अण्णा बोलमवाड हे नाव चर्चेत असून, धर्माबाद शहराला युवा नगराध्यक्ष लाभणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. भाजपने जर एकसंघ राहून उमेदवार दिला तर ‘एक हत्ती सत्ता’ साधण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसनेही युवा नेतृत्वाला पुढे आणण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे ही निवडणूक तरुण पिढीच्या नेतृत्वाची कसोटीची ठरणार आहे.

### शहराच्या राजकारणात वेगवान बदल

**धर्माबादच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत राजकीय चित्र वेगाने बदलत आहे. कार्यकर्त्यांचे बळ, सोशल मीडियावरचा प्रभाव, आणि जनतेतील थेट सहभाग हे घटक निवडणुकीचे चित्र स्पष्ट करणार आहेत. आगामी निवडणुकीत ‘गेमचेंजर’ चेहरे कोण ठरणार, यावरच शहराच्या भविष्यातील राजकीय दिशा ठरणार आहे.**

## विद्यादीपच्या कारभारावर प्रश्न

**छ. संभाजीनगर, दि.११ :** विद्यादीप बालगृह अधिकृत आहे की नाही, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बालगृह प्रशासनाने त्यांच्या अधिकृत लेटरहेडवर नियमाने बंधनकारक असलेला नोंदणी क्रमांकाचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळल्याचे उघडकीस आले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सामाजिक संस्थेच्या लेटरहेडवर शासनाकडे नोंदणी क्रमांकाचा उल्लेख करणे आवश्यक असतो. मात्र, विद्यादीप बालगृहाकडून विविध शासकीय विभागांना केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारात अनेकदा हा क्रमांक नसलेल्या लेटरहेडचा वापर केला जात होता. ते कोणाच्या वतीने चालवले जाते, संबंधित जबाबदार व्यक्ती, पदांचाही उल्लेख त्यात नाही. शासनाच्या वतीने येथील प्रत्येक मुलीच्या खर्चासाठी अडीच हजार रुपयांचा निधी दिला जात होता.

## महत्वाचे

### विद्यापीठात विद्यार्थी संघटना आक्रमक

**छ. संभाजीनगर:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विविध विद्यार्थी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत कुलगुरू व कुलसचिव यांच्या विरोधात गुरुवारी घोषणाबाजी करत निदर्शने आंदोलन केले. यावेळी पोलीस आणि विद्यार्थी यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. उपकुलसचिव हेमलता ठाकरे यांनी बुधवारी (दि.९) आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यानंतर विद्यार्थी संघटना संतप्त झाल्या आहेत. पोलिसांशी हुज्जत घालणाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले.

### सातबारा कोरा तर तत्काळ कर्ज द्या

**जालना:** मंठा तालुक्यातील वाई परिसरातील शेतकऱ्यांनी कोरा सातबारा असलेल्या खातेदारांना तात्काळ पीक कर्ज द्यावे, अशी मागणी केली आहे. हे शेतकरी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वाटूर फाटा शाखेचे खातेदार असून, ही शाखा त्यांच्यासाठी दत्तक शाखा म्हणून कार्यरत आहे. सध्या या बँकेत जुने पीक कर्ज नव्याने सुरू करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ज्यांचा सातबारा कोरा आहे, कोणत्याही बँकेचे कर्ज बोजा नाही, अशा शेतकऱ्यांना डावलले जात आहे.

### कामगार योजनेच्या चौकशीची मागणी



**जालना:** जालना जिल्ह्यातील मंठा आणि मौजपुरीसह चार ठिकाणी येथे कामगार योजनेतून अनुदान लाटल्याप्रकरणी गुन्हे दाखल झाले आहेत. नोंदणीकृत बांधकाम कामगारांची वेगवेगळ्या योजनांचा लाभ देण्यासाठी एजंट, दलाल, आणि संघटनांकडून सर्रासपणे आर्थिक लूट केली जात आहे, अशी तक्रार आहे. याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

### ५५ कोटी रुपये शेतकऱ्यांना मंजूर


**धाराशिव:** खरीप २०२४ मधील काढणी पश्चात पिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी धाराशिव जिल्ह्यातील ७५६७७ शेतकऱ्यांना ५५ कोटी रुपये मिळणार असून यासाठी आवश्यक निधीस मंजुरी मिळाली असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. खरीप हंगाम २०२४ मध्ये काढणीनंतर झालेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. यासाठी आवश्यक असलेल्या राज्य शासनाच्या अंतिम हप्त्याच्या १००० कोटी रुपये निधीच्या प्रस्तावाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंजुरी दिली आहे.

### अन्वाच्या डॉक्टरकडे मागितला खुलासा

**जालना:** अन्वा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारी यांनी केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना खुलासा मागितला आहे. अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने अन्वा येथील रुग्णांची परवड होत होती. त्याबद्दल नागरिकांनी तक्रार केली होती.

## धावत्या बसची दोन चाके निखळली; अनर्थ टळला

**परभणी, दि. ११–** धावत्या बसच्या पाठीमागील दोन्ही चाक निखळून पडल्याची घटना शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास पाथरी तालुक्यातील मोरेगावजवळ घडली. मात्र, चालकाने प्रसंगावध राखल्याने मोठा अनर्थ टळला. या बसमधून शाळकरी विद्यार्थ्यांस जवळपास ४० प्रवास करत होते.



मिळालेल्या माहितीनुसार, पाटोदा ते सेलू बस क्रमांक (एमएच २० बीएल ११२५) पाटोदा येथून शाळकरी विद्यार्थी व प्रवाशांना घेऊन सेलूकडे येत होती. देवगाव फाटा महामार्गावरील मोरेगाव नजीक डाव्या कालव्याजवळ धावत्या बसचे उजव्या बाजूची पाठीमागील दोन्ही चाके निखळून पडल्याने बस जागेबरच बसली. देवगाव फाटा महामार्गावर वाहनांची वर्दळ असते. याच वेळी समोरुन आणि पाठीमागून वाहने येत होती. बसचालक हनुमान सारुक यांनी प्रसंगावधान साधून बसच्या वेगावर वेळीच नियंत्रण साधल्याने मोठा अपघात टळला. या घटनेनंतर पाथरी आगाराच्या देखभाल दुरुस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## चाकू दाखवून लुटणारे अटकेत

**छ. संभाजीनगर, दि.११ :** चाकूचा धावक दाखवून मोबाईलसह रोख रक्कम लुटणाऱ्या तिघांना जवाहनगर पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना टिळकनगर येथे ९ जुलै रोजी दुपारी दीडच्या सुमारास घडली होती. शेख रिजवान शेख रहेमान (२४), शेख आदिल ऊर्फ बडा शेख जावेद (२२) व शेख आदिल शेख शाहरुख (२३, सर्व रा. शंभूनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

केशव राजू रैकवार (१८, रा. शिवशंकर कॉलनी) टिळकनगर येथे दुचाकीवर आलेल्या तिघांनी त्याला अडवले व गळ्याला चाकू लावून त्याच्याकडील चार हजार रुपये किमतीचा मोबाईल व रोख रक्कम पळवली.

## नांगरे पाटलांचा एआय चेहरा वापरून फसवणूक

### वरिष्ठ निवृत्त अधिकाऱ्याचे सायबर भामट्यांकडून ७८ लाख लंपास


**छ. संभाजीनगर, दि. ११ :** विभागीय आयुक्तालयातील एका सेवानिवृत्त शासकीय वरिष्ठ अधिकाऱ्याला डिजिटल अरेस्टची भीती दाखवून ७८ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यासाठी सायबर भामट्यांनी राज्याच्या लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांचा एआय चेहरा वापरल्याने खळबळ उडाली आहे.

या सायबर भामट्यांनी आर्टिफिशिअल इंटेलिजन्सद्वारे खोटा चेहरा बनवून नांगरे पाटील बोलत असल्याचं भासवले. त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयातून सेवानिवृत्त झालेला वरिष्ठ अधिकारी व त्याच्या पत्नीला व्हिडिओ कॉल केला. दहशतवाद्यांच्या खात्यातून तुमच्या बँक खात्यात संशयास्पद २० लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचे सांगितले. दोन ते सात जुलै या काळात सातत्याने फोन करुन त्यांना डिजिटल अरेस्टची भीती घालण्यात आली. आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोला, असे सांगत नांगरे पाटलांचा एआय चेहरा वापरत सायबर गुन्हेगाराने दाम्पत्याशी बातचित केली.

या सहा दिवसात सायबर गुन्हेगारांनी दाम्पत्याला ७८ लाख ६० हजार रुपयांचा गंडा घातल्याचा आरोप आहे. या प्रकरणी क्रांती चौक पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरु आहे.

अलीकडच्या काळात अशा घटनांत वाढ झाली आहे. त्यांच्या जाळ्यात फसून नका, अशा जाहिरातीही शासन मोठ्या प्रमाणावर करत आहे. नांगरे पाटील यांचा चेहरा वापरल्यामुळे या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा विश्वास बसला असावा.

### डिजिटल अरेस्ट नसतेच



**डिजिटल अरेस्टच्या नावे फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. यापूर्वीही देशभरात अशा अनेक घटना समोर आल्या आहेत. मात्र, डिजिटल अरेस्ट असा प्रकारच नसतो, त्यामुळे नागरिकांनी या प्रकारांना बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांनी केलं आहे.**

## पुतण्याने डोक फोडले; सुनेचा सासूला चावा

### म्हशी बांधण्यावरून केज तालुक्यात राडा, चौघांवर गुन्हा

**बीड, दि. ११:** पडिक जमिनीत म्हशी का बांधल्या ? म्हणून दोन पुतण्यांनी सख्ख्या चुलत्याला मारहाण केली तर सूनने सासूला चावा घेतला. केज तालुक्यातील येवला येथे घडलेल्या या घटनेत चौघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येवला येथे नरहरी जोगदंड आणि त्यांचा सख्खा भाऊ सखाराम जोगदंड यांच्यात वीस वर्षांपूर्वी जमिनीच्या व घराच्या वाटण्या झाल्या आहेत. त्यनंतरही त्यांच्यात जमीन आणि घराच्या वाटण्यावरून अनेक वेळा भांडणे होतात. ९ जुलै रोजी नरहरी जोगदंड यांनी त्यांच्या म्हशी या पडिक जागेत बांधलेल्या असताना त्यांचा भाऊ सखाराम जोगदंड याने सोडून दिल्या. म्हणून म्हशी पुन्हा बांधण्यासाठी नरहरी जोगदंड व त्यांची पत्नी सिंधू जोगदंड हे सखाराम जोगदंड यांच्या घरासमोरून जात होते. त्यावेळी सखाराम, त्याचा मुलगा श्रीराम जोगदंड आणि विक्रम जोगदंड, भावाची सून केशरबाई असे तेथे आले. म्हशी बांधण्यावरून त्यांच्यात शिवीगाळ सुरू झाली. त्या वेळी पुतण्या श्रीराम जोगदंड याने त्यांना चापट मारून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच दुसरा पुतण्या विक्रम जोगदंड याने काठी डोक्यात मारून डोके फोडले. नंतर सून केशरबाई श्रीराम जोगदंड ही नात्याने सासू असलेल्या सिंधुबाई जोगदंड हिच्या हाताला चावली आणि दुखापत केली.

## २ लाख ३० हजार बँकेतून लंपास

**जालना, दि. ११:** अंबड शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्या काउंटरवरून तालुक्यातील शेवगा येथील रामेश्वर गणेश बारहाते यांचे २ लाख ३० हजार रुपये भरदिवसा चोरी गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही चोरीची घटना थेट बँकेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, बँकेतील सुरक्षा व्यवस्थेच्या हलगर्जीपणावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

## आठ लाखांचे एमडी ड्रग्ज, एक पिस्टल लातुरात जप्त

**लातूर, दि. ११ :** शहरातील एलआयसी कॉलनी परिसरातील एका घरातून स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने ८ लाख रूपयांचे ७८ ग्रॅम मेफेड्रोन म्हणजेच एमडी ड्रग्ज जप्त केले. याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघांना ताब्यात घेतले असून एकजण फरार झाला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीवरून पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने गुरूवारी दुपारी एलआयसी कॉलनी परिसरातील एका घरामध्ये गणेश अर्जुन शेंडगे (वय २६, रा.एलआयसी कॉलनी, लातूर), रणजीत तुकाराम जाधव (वय २४, रा. दहिसर केमकतीपाडा, गोदावरी राणीचाळ, दहिसर पूर्व, मुंबई) यांना ताब्यात घेतले.

## कारमधून पावणेनऊ लाख लंपास

**छ. संभाजीनगर, दि. ११:** कारच्या सिटखाली पिशवीत ठेवलेले ८ लाख ७० हजार रुपये चोरीस गेल्याची घटना सिल्लोड येथील भराडी नाक्यावर घडली.

सिल्लोड तालुक्यातील पानवडोद येथे विष्णू सिनकर हे मिरचीचे व्यापारी आहेत. त्यांच्या दुकानावर सुनील बाबूराव दौड हा तरुण मॅनेजर म्हणून कामाला आहे. सुनील दौड कारमधून (एमएच २०, ईई ८४२४) शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये पैसे काढण्यासाठी आले होते. त्यांनी बँकेतून ८ लाख ७० हजार रुपये काढले. तसेच पैशांची पिशवी सिटखाली ठेवून गोळेगावकडे निघाले. यादरम्यान कारच्या टायरमध्ये हवा कमी असल्याने त्यांनी भराडी नाक्यावरील एका पंक्चरच्या दुकानावर हवा भरण्यासाठी कार उभी केली त्यावेळी हा प्रकार घडला.

### सीसीटीव्हीत अस्पष्ट फुटेज

**पोलिसांनी रस्त्यावरील दुकानाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. यात दोघे दुचाकीवरून आले व पैशांची पिशवी घेऊन जाताना सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. मात्र फुटेजमध्ये चोरट्यांचे चेहरे स्पष्ट दिसत नसल्याने पोलिसांची मोठी अडचण झाली आहे. चोरटे परराज्यातील असावेत, असा पोलिसांचा कयास आहे**

## यशवंत विद्यार्थी योजनेत गैरव्यवहार

**छ. संभाजीनगर, दि. ११ :** धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी श्रीमंत राजे यशवंतराव होळकर विद्यार्थी विकास योजनेत गैरव्यवहार होत असल्याचे उघडकीस आले आहे. शाळा सुविधा देत नसतील तर कडक कारवाई करून त्यांची मान्यता रद्द केली जाईल, असा इशारा इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिला आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत ही योजना राबवली जाते.

## मुख्याधिकारी सहा लाख घेताना अडकला

**बीड, दि. ११–** शासकीय योजनेतून केलेल्या दोन कामाचे दोन कोटी रुपयांचे देयक काढल्याच्या मोबदल्यात सहा लाख रुपयांची लाच घेताना माजलगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत इंद्रजित चव्हाण यांना गुरुवारी लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडले. हा कारवाई छत्रपती संभाजीनगरच्या पथकाने केली.




या घटनेतील तक्रारदाराच्या तक्रारीनुसार, नगरोत्थान योजनेतून नगर परिषदेमार्फत केलेल्या सिमेंट रस्त्याचे कामाचे देयक दोन कोटी रुपयांचे होते. ते काढल्याच्या मोबदल्यात ३ टक्के असे सहा लाख रुपये व राहिलेल्या उर्वरित कामांमधील रस्त्याचे बाजूचे अतिक्रमण काढून अडथळे दूर करून देण्यासाठी सहा लाख रुपये, असे एकूण १२ रुपये लाच मागण्यात आली होती. ही तक्रार आल्यानंतर १० जुलै रोजी तक्रारदार व पंचांच्या समक्ष मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्याकडे त्यांचे घरी पिताजीनगरी येथे पाठवून पडताळणी केली. तेव्हा चव्हाण यांनी तक्रारदाराकडे ५० टक्के म्हणजे सहा लाख रुपये तत्काळ घेऊन येण्याचे सांगितले. उर्वरित सहा लाख रुपये ११ जुलै रोजी देण्याचे ठरले होते. सहा लाख रुपये लाचेच्या रकमेसह चंद्रकांत चव्हाण यांना ताब्यात घेण्यात आले आहे. अंग झडतीत ॲपल कंपनीचा मोबाईल फोन, ओळखपत्र आढळले.

## श्रीफळाचे दर दुप्पट, आणखी दरवाढीचा अंदाज

### केरळ, तामिळनाडू, कर्नाटकात उत्पादनात लक्षणीय घट झाल्याचा परिणाम

**धाराशिव, दि. ११ :** शुभकार्याचा अविभाज्य भाग असलेले नारळ सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला चटके देत आहे. गेल्या सहा महिन्यांपासून नारळाच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. सध्या बाजारात एक नारळ ३० रुपयांना विकले जात आहे. दर्जानुसार काही ठिकाणी ४० रुपयांपर्यंत दर आकारले जात आहेत.

प्रत्येक मंगल कार्यात श्रीफळाचा मान असतो. त्यामुळे नारळाला बाराही महिने मागणी असते. साधारपणे सामान्यतः १५ ते २० रुपये दरम्यान मिळत होता. सध्या नारळाच्या किमती दुप्पट झाल्या आहेत. केरळ, तामिळनाडू व कर्नाटक राज्यांतील हवामान बदल, उत्पादनात घट आणि वाहतूक खर्च वाढल्यामुळे दर वाढले आहेत, असे व्यापारी सांगत आहेत. सध्या धाराशिवच्या बाजारात एका नारळाची किंमत ३० रुपयांपर्यंत पोहोचली आहे, तर वाळलेल्या खोबऱ्याचे दर ३५० रुपये प्रति किलोच्या पुढे गेले आहेत.



दिवाळीपर्यंत हे दर ४०० रुपये किलोच्या पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सुमारे सहा महिन्यांपूर्वीपर्यंत बाजारात नारळ १५ ते २० रुपये दराने सहज उपलब्ध होता. परंतु अलीकडे दर हळूहळू चढत गेले आणि आता ३० रुपयांवर पोहोचले आहेत. काही भागांमध्ये दर्जानुसार नारळ ३५ ते ४० रुपयांपर्यंत विकले जात असल्याचे चित्र आहे. शहरात महिन्याकाठी १० ते १५ ट्रक नारळ लागतात. मात्र नारळ उत्पादकांची संख्या दिवसेंदिवस घटू लागली आहे. तर अस्मानी संकटामुळेही उत्पादन घटू लागल्याचे पुरवठादार सांगत आहेत.

### मागणीपेक्षा पुरवठा कमी

**या दरवाढीमागे अनेक कारणे दिली जात आहेत. दक्षिण भारतीय हॉटेल्सची वाढती संख्या आणि शहाळे पिण्याचे वाढलेले प्रमाण यामुळे पुरवठा आणि मागणी यात व्यस्त प्रमाण निर्माण झाले आहे. नारळाला असलेली मागणी वाढतच असून त्याचा ताण पुरवठ्यावर येत आहे. दुसरीकडे, नारळ उत्पादक राज्यांमधील अस्मानी संकट यामुळे नारळाचा मागणीनुसार पुरवठा होत नाही.**

## Change in Name

CHANGE IN NAME A MY OLD NAME
**MAJRODDIN. MAYINODDIN.**
which now i am changing as
**New NAME**
**MAZHARUDDIN MOINUDDIN.**
Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please Consider the Same.
**ADDRESS:**
S/o Moinuddin. Sai Nagar,
Itwara Nanded S.o.Nanded
Maharashtra - 431604.
Mob No:- 9923361983

## टी.सी.हरवली

माझी विशाल गंगाधर डोगळे या नावाची इयत्ता १० वी पासची टी.सी. खानापूर फाटा ते देगलूर एस.टी.प्रवासा दरम्यान हरवली आहे.

तरी कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता – विशाल डोगळे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर रामपूर रोड देगलूर

## थोडक्यात

### अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त कार्यक्रम

**नांदेड, दि.११:** साहित्यरत्न लोकशाहीर कॉम्रेड डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निम्मित दर वर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा मोठ्या आंनदाने आणि थाटामाटात साजरी केली जाईल. १०५ व्या जयंती निम्मित जिल्हा जयंती मंडळा तर्फे विविध उपक्रमाचा या मध्ये समावेश केला जाईल, त्या मध्ये समाजातील ७५ टक्के पेक्षा जास्त गुण असणारे गुणवंत विद्यार्थाचा सत्काराचा कार्यक्रम ०१ ऑगस्ट लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे चौक नांदेड आयोजित केला जाणार आहे.

### अनिकेत बल्लाळ यांची नागपूरला बदली

**नांदेड, दि.११:** नांदेड आगार येथील विद्यमान आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांची एसटी महामंडळ आस्थापनाने सेंट्रल वर्कशॉप हिंगना रोड कार्यशाळा नागपूर येथे उपअधीक्षक या पदावर निवड झाली आहे. यावेळी कर्मचाऱ्यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मिलींदकुमार सोनाळे, विष्णू हारकळ, श्रीनिवास रेणके, गुणवंत एच. मिसलवाड, पाळी प्रमुख कैलास वाघमारे, संजय खेडकर आदींची उपस्थिती होती.

### डॉ.सुधीर रसाळ यांचे व्याख्यान

**नांदेड,दि.११ :** नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने प्रा.नरहर कुरुंदकर यांच्या ९३व्या जन्मदिनानिमित्त मंगळवार, दि.१५ जुलै रोजी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ समीक्षक डॉ.सुधीर रसाळ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.त्यांच्या व्याख्यानाचा विषय मराठी वाङ्मयीन संस्कृती : आजची अवस्था असा आहे.

### अमरनाथ यात्रेसाठी भाविक रवाना

**नांदेड, दि. ११ :** जुना कौठा नांदेड येथील भाविक भक्त मोठ्या संख्येने शुक्रवारी हर हर महादेवच्या घोषणा देत अमरनाथ यात्रेसाठी रवाना झाले आहेत. यामध्ये दत्ता काकडे, मारोती उर्फ पिंटू गोरे, तुकाराम काकडे, बालाजी काळे, हनुमान काळे, देवानंद काळे हे रवाना झाले आहेत. रेल्वेस्टेशनवर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मित्र मंडळ उपस्थित होते. पुढील प्रवास सुखरूप व आनंदाचा जावो, अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते भारत काकडे, आदींची उपस्थिती होती.

### शहरात पाऊस

**नांदेड, दि. ११ :** नांदेड शहरात रात्री १० च्या सुमारास जोरदार पाऊस झाला आहे. या पावसामुळे वातावरणातला उकाडा कमी झाला आहे. तब्बल दोन दिवसाच्या विश्रांतीनंतर हा पाऊस झाला आहे.

# विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना तातडीने विमा मंजूर करावा

## माजी मुख्यमंत्री, खा. अशोकराव चव्हाण यांची विमा कंपनीला सक्त सूचना...!

**अर्धापूर, दि. ११ :** तालुक्यात मोठ्या प्रमाणात वादळी वाऱ्याने केळीचे मोठे नुकसान झालेले असतानाही विमा कंपनी मात्र याबाबत नकारात्मक प्रतिसाद देत आहे. याबाबत शेतकऱ्यांनी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या कानी घालताच त्यांनी निवेदन दिल्यानंतर अवघ्या चोवीस तासात नांदेड जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक घेतली. केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मी स्वतः बांधावर जाऊन आलो आहे. केवळ तांत्रिक बाबी पुढे करता विमा तातडीने मंजूर करावा अशा सक्त सूचना विमा कंपनीच्या प्रतिनिधींना केल्या आहेत. तसेच



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबतच लवकरच बैठक घेणार असल्याचे सांगितले.

दि.९ जून वादळी वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. अशातच अर्धापूर मंडळाचे हवामान मापक यंत्र चेनापूर येथे बसविण्यात आले आहे. हवेचा ताशी ८० किलोमीटर वेगाने असतानाही शेतकऱ्यांना केळी पिकाचा विमा द्यावा लागतो म्हणून केवळ ताशी ८० किलोमीटर इतकाच वेग या यंत्राच्या माध्यमातून दाखवण्यात आला आहे. पन्नास वर्षे जुनीही मोठी असणारी झाडे या वाऱ्याने उन्मळून पडली. त्यातच केळीचे नाजूक पीक कसे टिकेल? या मंडळात केळी उत्पादक शेतकऱ्यांनी पदरमोड करून मोठ्या संख्येने पीक विमा काढुन त्यांना मिळत नसेल तर काय कामाचा? वादळी वाऱ्यामुळे केळी बागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असताना विमा देण्याबाबत कंपनी अजूनही अनुकूल नाही.

**केळी उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान समोर दिसत असताना तांत्रिक बाबी समोर न करता तात्काळ विमा मंजूर करून नुकसान भरपाई द्यावी. यावेळी अशा सूचना यावेळी खा. अशोकराव चव्हाण यांनी केल्या. मुंबई येथे मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांच्या सोबत बैठक घेऊन नुकसानग्रस्त केळी उत्पादक शेतकऱ्यांना पीक वीमा मिळवून देण्यासाठी सकारात्मकता दाखविली.**

स्वतः गांभीर्याने लक्ष्य देऊन चौकशी करावी व केळी उत्पादक शेतकऱ्यांना विमा मिळवून देऊन दिलासा द्यावा. अशी मागणी एका निवेदनाद्वारे केळी उत्पादक शेतकरी नागोराव भांगे पाटील, अवधूतराव कदम, रामराव भालेराव यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती.

याबाबत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनाही निवेदन दिले. त्यांनीही हा विषय सांगितल्यानंतर चोवीस तासातच ॲक्शन घेतली. खा. चव्हाण स्वतः उपस्थित राहत नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सर यांच्या दालनात विमा कंपनीचे प्रतिनिधी व शेतकरी यांची बैठक घेतली. यावेळी अर्धापूर मंडळामध्ये बसविण्यात आलेल्या हवामान मापक यंत्राबाबत साशंकता शेतकऱ्यांनी व्यक्त केली. तसेच शास्त्रज्ञानी दिलेल्या अहवालाप्रमाणे केळी विमा मंजूर करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती किशोर स्वामी, पत्रकार नागोराव भांगे पाटील, भाजप तालुका सरचिटणीस अवधुतराव कदम, माजी जि. प.सदस्य रामराव भालेराव, परमेश्वर बंडाळे आदी उपस्थित होते.

### डॉ.शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रातर्फे एकदिवसीय कार्यशाळा

**नांदेड, दि. ११ :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि दूरदृष्टीचे राजकारणी 'जलशंकर' डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त सोमवार दि.१४ जुलै रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रातर्फे ''मराठवाड्यातील सामाजिक आर्थिक विकास: समस्या व उपाय योजना'' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार असून या कार्यशाळेसाठी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे कुलगुरू प्रा. प्रशांत बोकारे यांच्यासह जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

### डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय रुग्णालयात

# हिमालया बेबी फिडिंग सेंटरचा लोकार्पण सोहळा

**नांदेड दि. ११ :-** महिला सक्षमिकरण अंतर्गत स्तनपान करणाऱ्या महिलांना हक्काची जागा आणि समानतेची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हिमालय कंपनीच्या सी.एस.आर निधीतून डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे दोन हिमालया वेबी फीडिंग पॉड नुकतेच बसवण्यात आले आहे. यासाठी हिमालया बेबी फिडिंग प्रकल्प समन्वयक असिफ भट यांनी मोलाची मदत केली आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबईच्या अधिनस्त




राज्यस्तरावर सी.एस.आर कक्ष स्थापन करण्यात आलेला असुन या कक्षाचे सचिव विजय गायकवाड समाजसेवा अधीक्षक यांच्यामार्फत समाजसेवा अधीक्षक विभागाच्या समन्वयाने नांदेड येथे वेबी फीडिंग पॉड उपलब्ध करून देण्यात आले आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथील बाह्यरुग्ण विभागातील ओ.पी.डी. क्र. ११८ स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग आणि ओ. पी.डी.क्र. १२७ बालरोग विभाग येथे हिमालया बेबी फीडिंग सेंटर बसविण्यात आले. सदर हिमालया बेबी फीडिंग सेंटरचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते नुकतेच ९ जुलै रोजी संपन्न झाले. सदर कार्यक्रमास रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, डॉ. एस. आर. वाकोडे, प्राध्यापक व विभाग प्रमुख, स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र,

**या बेबी पॅडमध्ये एकाच वेळेस चार स्तनदा माता यांना बाळांना दूध पाजण्यासाठीची व्यवस्था करण्यात आली आहे. एक प्रकारे स्त्री सक्षमीकरण आणि समानतेची संधी याद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

डॉ. इस्माईल इनामदार, विभाग प्रमुख, जनऔषधवैद्यकशास्त्र विभाग व डॉ. शिवानंद देवसरकर, उप वैद्यकीय अधीक्षक, सर्व समाजसेवा अधीक्षक तसेच परिचर्या संवर्गातील कर्मचारी व रुग्ण व रुग्णनातेवाईक हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजसेवा अधीक्षक राजरत्न केळकर यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता अनिल नागमवाड, संतोष मुंगल, विजय खरात, संजय रत्नपारखी व दिपाली पेटकर या समाजसेवा अधीक्षक यांनी परिश्रम घेतले.

# २० मोबाईल, एक दुचाकी चोरी; ५ घरफोडीचा गुन्हा उघडकीस

**नांदेड दि. ११ :** शहरातील शिवाजीनगर, भाग्यनगर, विमानतळ आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या पाच गुन्ह्यांमधील तसेच एक मोटार सायकल आणि २० मोबाईल चोरीचे गुन्हे नांदेड ग्रामीण पोलिसांनी उघडकीस आणले आहेत. या प्रकरणात ग्रामीण पोलिसांनी चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून एकाला अटक केली आहे.

ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील सर्व प्रभारी पोलीस ठाणे अधिकाऱ्यांना चोरी आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी १० जुलै रोजी मिळालेल्या माहितीनुसार दिवेश मारुती कदम याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याच्याजवळ असलेली दुचाकी चोरीची असल्याचे त्याने सांगितले. या आरोपींची घरझडती घेतली असता त्यांच्या घरातून रोख १५ हजार ८०० रुपयांसह एक दुचाकी, सोन्या-चांदीचे दागिने तसेच २० वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल असा एकूण ३ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# सगरोळी-हिंगणी पांणद रस्त्याचा मार्ग मोकळा




**बिलोली, दि. ११ :** तालुक्यातील सगरोळी व हिंगणी गावातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाचा असणाऱ्या पांदन रस्त्याच्या मंजुरीचा मार्ग मोकळा झालेला आहे.भाजयुमो जिल्हाध्यक्ष सतीश गौड यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठपुरावा केला.

बिलोली तालुक्यातील सगरोळी-हिंगणी येथील शेतकऱ्यांच्या वापरासाठी जुना पांदन रस्ता आहे. ह्या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाल्याने शेतकऱ्यांना शेतीचे कामे करणे जिकरीचे झाले होते.ररस्त्यावर असलेल्या छोट्या नाल्यावरून वाहतूक करताना जीव मुठीत घेऊन शेतकरी आपली कामे करीत आहेत.ह्या शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन भाजयुमो जिल्हाध्यक्ष सतीश गौड मोतीवार यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मुंबई येथे भेट घेऊन ह्या रस्त्याला मंजुरी देण्यासाठी आग्रह धरला. दि. ९ जुलै रोजी तहसीलदार गजानन शिंदे यांनी वरिष्टांच्या आदेशवरून संबंधित यंत्रणेला सोबत घेत जायमोक्यावर जाऊन स्थळ पाहणी केली.यावेळी ग्रामविकास अधिकारी धम्मानंद धोत्रे, भूमी अभिलेख विभागाचे मिरदोडे, सरपंच प्रतिनिधी उसकेलवार यांच्यासह महसूल च्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. प्रशासनाकडे गौड यांनी योग्य पाठपुरावा केल्याने शेतकऱ्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# आय लव्ह माहूर लिहिणे भोवले; सेल्फी पॉइंटची तोडफोड

**माहूर, दि. ११ :** माहूर नगरपंचायत च्या वतीने माहूर गडावर जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला निसर्गरम्य ठिकाणी आय लव माहूर असा मजकूर असलेले सेल्फी पॉईंट तयार करण्यात आले होते. या ठिकाणी माहूर गडावर येणारे भाविक पर्यटक व शहरातील नागरिक फोटो काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करीत होते व या ठिकाणचा आनंद घेत होते. मात्र काही विघ्न संतोषी समाजकंटकांनी या सेल्फी पॉईंट मधील मजकुराची तोडफोड करून केली आहे व नुकसान केले आहे अशी तक्रार मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी ११ रोजी माहूर पोलीस




ठाण्यात दिल्याने पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी तात्काळ गुन्हा दाखल केला आहे

माहूर शहरातून गडावर जाणाऱ्या रस्त्यावरील निसर्गरम्य ठिकाणी नगरपंचायतचे

### आरोपींवर गुन्हा दाखल

नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी मुख्याधिकारी विवेक कांदे यांचे सर्व नगरसेवकांनी आय लव यू माहूर लिहिलेले इलेक्ट्रिक बोर्ड या ठिकाणी लावले होते या ठिकाणी हजारो भाविक तसेच तालुक्यातील नागरिक सेल्फी घेत आनंद व्यक्त करत होते. परंतु या ठिकाणाचे पावित्र्य अबाधित राहिले पाहिजे. या प्रकरणाची दखल घेऊन नगरपंचायतचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी माहूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. यावेळी नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड यांचे सह सर्व नगरसेवक अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

**माहूर श्रीक्षेत्र हे धार्मिकस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. या धार्मिक स्थळाचे पावित्र्य जपणे आपले कर्तव्य आहे, अशा ठिकाणी सेल्फी पॉईंट उभारून पावित्र्य भंग करण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, यासाठी नागरिकांनी दक्षता घेऊन आपले उपक्रम कुठल्याही संहितेला बाधा आणू नये, असे म्हटले जात आहे.**

### आषाढी निमित्त वृक्षारोपण

**मुदखेड, दि.११ :** आषाढी एकादशी निमित्त पारडी वैजापूर दत्त मंदिर माळ टेकडी येथे वृक्षारोपण करून पवित्र एकादशी साजरी करण्यात आली. यावेळी बाबाजी तसेच गावातील पर्यावरण प्रेमी व नागरिकांनी माळटेकडी परिसर हरित व सुशोभीकरण करण्याचा संकल्प केला. यावेळी नांदेड येथील उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, तहसीलदार आनंद देऊळगावकर तानाजी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण झाले.

# ट्रॅक्टरचे हेड तहसिल कार्यालयातून लंपास

**देगलूर, दि. ११ :** एरव्ही अवैध गौण खनिज प्रकरणातील जप्त करण्यात आलेले ट्रॅक्टरचे सुटे भाग काढून पळविल्याचे अनेक घटना आहेत मात्र आत्ता चक्क ट्रॅक्टरचेच हेड तहसील कार्यालयाच्या प्रांगणातून चोरीस गेल्याची खळबळ जनक घटना घडली आहे. एकूणच तहसील कार्यालयाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेवरून तहसील कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आल्याचे दिसून येत आहे , त्यामुळे तहसीलदार भरत सूर्यवंशी नेमके कशात मश्गुल आहेत याचे उत्तर मात्र अनुत्तरीत आहे. शासन दरबारातून अशा जर चोऱ्या होत असेल तर दाद मागव तरी कोणाकडे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. या बाबीकडे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी लक्ष देणे गरजेचे बनले आहे.

अवैध गौण खनिज प्रकरणातील जप्त करण्यात आलेल्या ट्रॅक्टर व बोलेरो तथा टिप्पर हायवा अशा वाहनाचे काही भाग तहसील व उपजिल्हाधिकारी कार्यालयातून लंपास झाल्याचे घटना पुढे आले आहेत अशातच तालुक्यातील गवंडगाव माळरानाच्या शिवारातून गेल्या आठवड्यात रात्री अकराच्या सुमारास जेसीबीच्या साह्याने अवैध मुरूम उत्खनन करून दोन ट्रॅक्टर मध्ये भरताना महसूल विभागातील काही कर्मचाऱ्यांनी त्यास रंगेहात पकडले आणि कारवाईच्या अनुषंगाने उपरोक्त वाहन तहसील कार्यालयाच्या पाठीमागील मैदानात जमा करण्यात आले.

सदरील प्रकार तहसील कार्यालयाच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये कैद आहे. असे असतानाही जेसीबी व दोन ट्रॅक्टर पैकी एका ट्रॅक्टरचे अर्जुन कंपनीचे हेड अज्ञात चोरट्याने तहसील कार्यालयाच्या मैदानातून चोरून नेला आहे. याप्रकरणी महसूल विभागाकडून येथील पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे

### समाज माध्यमांवर बदनामी करणाऱ्या

# दोन तृतीपंथीयांवर गुन्हे दाखल करा

## जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**नांदेड, दि. ११:** - समाज माध्यमांवर व्हिडिओ व्हायरल करून हिंदू मुस्लिम जातीय दंगल घडवण्याचा प्रयत्न करत तृतीपंथीयांची बदनामी करणाऱ्या गौरी शाहनुर बकश व आशिका गौरी बकश या दोन तृतीपंथीयावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले आणि पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडे शहरासह जिल्ह्यातील समस्त तृतीयपंथी यांनी शुक्रवारी एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गौरी शाहनुर बकश



उर्फ गौरी अहेमद बकश आणि गौरी उर्फ रामप्रसाद गंगाराम नांदुरे रा.सध्या मानवत यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करीत बदनामी करणारी पोस्ट केली आहे. तसेच व्हाट्सअप इंस्टाग्रामवर खोटे पोस्ट करून तृतीयपंथींचे नाव खराब करत परभणी व नांदेडच्या तृतीयपंथांना नाहक त्रास देत असल्याचे देखील नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर रंजीता बकश.(गुरु) बिजली बकश, जया बकश, अर्चना बकश, फरिदा बकश, बकश, प्रिया पवार आदींसह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महिला वाहकास मारहाण; गुन्हा दाखल

**भोकर, दि. ११ :** नांदेड ते भोकर कडे येणाऱ्या बसमध्ये कर्तव्य बजावत असलेल्या महीला वाहकास तिघांनी शुल्लक कारणावरून मारहाण करून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याने दोन महीले सह एका पुरुषा विरुद्ध पोलीसात सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दि . ११ जुलै रोजी दुपारी ३:३० वाजता नांदेड कडून भोकरकडे येणारी बस क्र. एम एच २० बीसी २०५० च्या महिला वाहक शिवनंदा बालाजी रेनके या कर्तव्यावर असतांना बाबनवाडी स्थानकावर बस थांबताच बस मधुन उतरणाऱ्या सरसबाई गायकवाड , गिरजाबाई धनवे व सोबत असलेला पुरुष परमेश्वर धनवे रा. बाबनवाडी यांनी सुट्या पैशासाठी वाद घालुन वाहक यांना सर्व प्रवाशा समोर थापड बुक्यांनी मारहण करून जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी महिला वाहक यांच्या तक्रारी वरून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# लोकसंख्या नियंत्रण सप्ताहानिमित्ताने विविध उपक्रम

**नांदेड, दि. ११ :** जिल्ह्यात दि.११ ते १८ जुलै दरम्यान जागतिक लोकसंख्या सप्ताह साजरा करण्यात येणार असून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसंख्या वाढीचे परिणाम, कुटुंब नियोजनाचे फायदे, सुरक्षित मातृत्व व बालमृत्यू प्रतिबंध यासंबंधी जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी दिली आहे .

या सप्ताहात लोकसंख्या वाढीचे आरोग्यावर व सामाजिक विकासावर होणारे परिणाम लक्षात घेता नागरिकांमध्ये कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी जनजागृती मोहीम




राबविण्यात येणार आहेत. यावर्षी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त नियोजित पालकत्वासाठी आरोग्यदायी वेळ आणि गर्भधारणेतील अंतर असी थीम असून,'' आई होण्यासाठी योग्य वय तेव्हा, शरीर व मनाची तयारी जेव्हा '' असे घोषवाक्य आहे या सप्ताहात जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये कुटुंब नियोजन साधनांची माहिती, समुपदेशन शिबिर,पोस्टर प्रदर्शन, फेरी,गाव पातळीवरील चर्चासत्र आणि सोशल मीडिया जनजागृती अभियान राबवले जाणार आहे. तसेच कुटुंब नियोजन साधने, मातृत्व, किशोरवयीन आरोग्य आणि संतुलित लोकसंख्येचे फायदे यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके व अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सलमा हिरानी यांनी सांगितले.